रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक ३५६
www.ramprahar.com
शुक्रवार, १४ जुलै २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

'सौर प्रकल्पासाठी जमिनींची निश्चिती त्वरित करावी'/२
खालापुरात ३६५ दिवस वृक्षलागवडीचा संकल्प/५
अवैध वाहतूक करणाऱ्यांकडून पावणेसात लाखांचा दंड वसूल/६

## चांद्रयान-३चे थेट प्रक्षेपण पाहण्यासाठी 'इस्रो'कडून व्यवस्था



**श्रीहरिकोटा** : भारताच्या चांद्रयान-३ या मोहिमेकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा येथील अंतराळ केंद्रातून शुक्रवारी (दि. १४) दुपारी २.३५ वाजता चांद्रयान-३ अंतराळात प्रक्षेपित होईल. चांद्रयान-२ मोहीम अंशत: अयशस्वी झाल्यामुळे भारताच्या चांद्रयान-३ मोहिमेला वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. चांद्रयान-३च्या लँडरने २३ किंवा २४ ऑगस्ट रोजी चंद्राच्या पृष्ठभागावर सॉफ्ट लँडिंग करणे अपेक्षित आहे. राष्ट्रीय अंतराळ संस्थेने नागरिकांना चांद्रयान-३चे प्रक्षेपण पाहण्यासाठी आमंत्रित केले आहे. नागरिकांना हे थेट प्रक्षेपण https://lvg.shar.gov.in/VSCREGISTR-TION या लिंकवर नोंदणी करून SDSC-SH-R, श्रीहरिकोटा येथील लॉन्च व्ह्यू गॅलरीतून पाहता येणार आहे. ISROने ट्विट करत नागरिकांना हे प्रक्षेपण पाहण्यासाठी आमंत्रित केले आहे.

# कर्नाळा बँक बुडविणाऱ्या भ्रष्टाचारी विवेक पाटलांनी दिला शेकापचा राजीनामा

## तब्येतीचे कारण देत सक्रिय राजकारणातून निवृत्ती

पनवेल : रामप्रहर वृत्त

**कर्नाळा बँक बुडविणारे शेतकरी कामगार पक्षाचे नेते माजी आमदार विवेक पाटील मागील दोन वर्षांपासून तळोजा कारागृहात असून त्यांनी कारागृहातून पत्र जाहीर केले आहे. त्यामध्ये आजारपणाला कंटाळून शेकापच्या सक्रिय राजकारणातून राजीनामा देत असल्याचा उल्लेख केला आहे. हे पत्र सध्या सोशल मीडियासाठी त्यांनी जाहीर केले आहे.**



पाटील यांचे राजीनामा पत्र गुरुवारी सकाळपासून समाजमाध्यमांवर पसरल्याने पनवेलमध्ये राजकीय चर्चेला सुरुवात झाली आहे. शेकापचे माजी आमदार बाळाराम पाटील यांनी हे राजीनामा पत्र खरे असल्याचे सांगत कार्यकर्त्यांसाठी आणि पदाधिकाऱ्यांसाठी दुदैवी बाब असल्याचे स्पष्ट केले. त्याचप्रमाणे दुसऱ्या बाजूला अशा प्रकारचे पत्र व्हायरल करून लोकांची सहानुभूती मिळविण्याचा केविलवाणा प्रयत्न सुरू असल्याचे बोलले जात आहे.

त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात त्यांनी त्यांचा पत्ता 'एमबी ३८७, सर्कल हॉस्पिटल, तळोजा मध्यवर्ती कारागृह, खारघर, नवी मुंबई', हा दिला आहे. तसेच पत्राची तारीख आहे १२ जुलै २०२३. या प्रसिद्धी पत्रकात त्यांनी नमूद केले आहे की, मी शेकापचा १९७९पासून सक्रिय कार्यकर्ता आहे. पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांनी प्रचंड मेहनत घेऊन मला दोन वेळा जिल्हा परिषदेवर निवडून दिले. गेली दहा वर्ष पनवेल पंचायत समितीचा सभापती म्हणून काम करण्याची संधी दिली, तसेच १९९५, १९९९, २००४, २००९ असे चार वेळा विधानसभेवर निवडून दिले होते. २० वर्षे आमदार म्हणून काम करण्याची संधी दिली. त्या सर्व कार्यकर्त्यांचे हितचिंतकांचे त्यांनी आभार मानत आहे.

पुढे या पत्रात त्यांनी म्हटले आहे की, तुम्हाला माहितच आहे गेल्या चार वर्षांपूर्वी एका जीवघेण्या आजारातून मी बरा झालो. आता पुन्हा त्याच आजाराने त्रस्त आहे. शारीरिक व्याधींमुळे मला यापुढे काम करणे शक्य होणार नाही, म्हणून मी राजकारणातून निवृत्ती घेत असून शेतकरी कामगार पक्षाचा राजीनामा देत आहे.

> **विवेक पाटील यांनी राजकारणातून निवृत्ती घेतल्याचे पत्र समाजमाध्यमांवर फिरत आहे. खरंतर विवेक पाटलांनी केलेल्या प्रतापामुळे जनतेने त्यांना निवृत्त करायचा निर्णय २०१४ सालीच घेतला. प्रकृतीचे कारण विवेक पाटलांनी दिले आहे. मी त्यांची प्रकृती चांगली रहावी यासाठी सदिच्छा देतो, कारण त्यांनी केलेल्या भ्रष्टाचाराची फळे त्यांनीच भोगली पाहिजेत. ज्या भ्रष्टाचाराच्या विळख्यात हजारो ठेवीदारांचा विवेक पाटलांनी बळी द्यायचा प्रयत्न केला त्या भ्रष्टाचाराची शिक्षा त्यांनी भोगायलाच हवी. यासाठी तरी परमेश्वराने त्यांना चांगली प्रकृती द्यावी ही सदिच्छा.**
> **-आमदार प्रशांत ठाकूर**, अध्यक्ष भाजप, रायगड जिल्हा

**माजी आमदार व शेकापचे नेते विवेकानंद पाटील यांनी पक्षाचा राजीनामा देऊन राजकारणातून निवृत्ती घेतल्याचे पत्र समाज माध्यमांवर फिरत आहे, ते खरे आहे. आम्ही सर्व कार्यकर्ते त्यांना आपला राजीनामा परत घेण्यासाठी विनंती करणार आहोत. आम्हाला खात्री आहे ते आपला राजीनामा मागे घेऊन राजकारणातून निवृत्ती घेणार नाहीत.**
**-गणेश कडू, सरचिटणीस, पनवेल शेकाप**

**माजी आमदार व शेकापचे नेते विवेकानंद पाटील यांनी पक्षाचा राजीनामा देऊन राजकारणातून निवृत्ती घेतल्याचे पत्र आमच्याकडे आले आहे.**
**-आस्वाद पाटील, जिल्हा चिटणीस, शेकाप**

चार वर्षांपूर्वी विवेक पाटील यांच्यावर ते अध्यक्ष असलेल्या कर्नाळा बँकेत त्यांनी ५४८ कोटी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी उघड केले होते.

विवेक पाटील यांच्यासह त्यांचे पुत्र आणि बँकेच्या इतर संचालकांवर कारवाई सुरू असताना विवेक पाटील यांनी शेकापमधून राजीनामा दिल्याची घोषणा केल्याने पनवेल व उरण परिसरात उलटसुलट चर्चा सुरू आहे. भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी कर्नाळा बँकेचे प्रकरण उजेडात आणून विवेक पाटील यांच्यावर कारवाई करण्यास सीआयडी आणि सक्तवसुली संचालनालय (ईडी) विभागांना भाग पाडले होते. यासाठी माजी खासदार किरीट सोमय्या यांनी वेळोवेळी ईडी कार्यालयात पाठपुरावा केला होता.



## धर्मयुद्ध जिंकण्यासाठी कुटनीती वापरावी लागते -उपमुख्यमंत्री फडणवीस

**ठाणे : प्रतिनिधी**

अनेक लोक नैतिकतेचा प्रश्न उपस्थित करीत आहेत, पण नैतिकतेने राजकारण करण्यासाठी राजकारणासह रहावे लागते. महाभारतात श्रीकृष्णाला माहित होते की, धर्मयुद्ध जिंकायचे असेल तर कुटनीती वापरावी लागते. लोक म्हणतात तुम्ही दोन पक्ष फोडले, कुणी म्हणते तुम्ही घर फोडले. मला विचारायचे आहे की, जनादेशाची हत्या करण्याचे काम कुणी केले? पक्ष फोडले म्हणणाऱ्यांना एकच सवाल आहे की, एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे काय काल राजकारणात आले आहेत का? मी मोहिनी घातली आणि ते माझ्या मागे आले. ज्या ज्या वेळी अन्याय होईल त्या-त्या वेळी एकनाथ शिंदे जन्माला येतील, अशी स्पष्टोक्ती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

भाजपतर्फे महाविजय अभियान २०२४ या कार्यक्रमाचे भिवंडी येथे आयोजन गुरुवारी (दि. १३) करण्यात आले होते. या कार्यक्रमामध्ये बोलतांना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी २०१९मध्ये उद्धव ठाकरेंसोबत बंद दाराआड झालेल्या चर्चेचा पुन्हा उल्लेख केला. या वेळी भाजपचे राष्ट्रीय जनरल सेक्रेटरी सी. टी. राव, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मुंबई अध्यक्ष आशिष शेलार, महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, ठाणे शहर अध्यक्ष आमदार निरंजन डावखरे यांच्यासह भाजपचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, माझ्या मनात संभ्रम नाही. एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात जी युती झाली ती आमची भावनिक युती झाली. वादळं आली असतील, व्यक्ती व्यक्तींचे काही झाले असेल पण भावनिक युती आहे. राष्ट्रवादीसोबत युती आहे ती राजकीय मैत्री आहे. कदाचित् ती पण भावनिक मैत्री येत्या काळात होईल, पण आज हे आमच्या मनात हे स्पष्ट आहे.

उद्धव ठाकरेंनी नुकतेच पोहरा देवीचे दर्शन घेतले. त्या वेळी त्यांनी भाषण करून हे सांगितले क, पोहरादेवीची शपथ घेऊन सांगतो भाजपने फसवले. उद्धव ठाकरेंनी पोहरादेवीची खोटी शपथ घेतली असेल आणि नंतर माफी मागितली असेल. २०१९ला काय घडले तो घटनाक्रम त्यांनी कथन केला, तसेच आपण धर्मानेच वागतो आहोत, असेही देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

आपल्या नव्या सरकारला एक वर्ष पूर्ण झालं आहे. वर्षपूर्ती होता होता, संपर्कसे समर्थन तक हा कार्यक्रम यशस्वी होऊन आपल्या सरकारमध्ये एक नवा सहकारीही आपल्याला मिळाला. आपले महाभारत सांगते, जरासंधाने मथुरेवर वारंवार आक्रमण केले, मग श्रीकृष्णाने द्वारका वसवली आणि जरासंध आणि कौरवांचाही नाश केला. **(पान २ वर..)**

## निवडक

### माजी खासदार विजय दर्डा कोळसा खाण गैरव्यवहारात दोषी

**रायपूर** : छत्तीसगडमधील कोळसा खाण वाटपातील गैरव्यवहारात विशेष न्यायालयाने काँग्रेसचे माजी खासदार विजय दर्डा, मुलगा देवेंद्र दर्डा, माजी सचिव एच. सी. गुप्ता, के. एस. क्रोफा, के. सी. सामरिया व संचालक मनोज कुमार जयस्वाल यांना दोषी ठरवले. त्यांना १८ जुलैला शिक्षा सुनावणार आहेत.

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा उद्या नवी मुंबईत सत्कार

**नवी मुंबई** : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा जाहीर नागरी सत्कार सोहळा नवी मुंबई शिवसेनेच्या वतीने शनिवारी (दि. १५) वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात आयोजित करण्यात आला आहे. या वेळी कार्यकर्ता मेळावा होणार असून मुख्यमंत्री मार्गदर्शन करणार आहेत.

**रायगडचे पर्जन्यमान**

**२४ तासांतील पाऊस : १०.५ मिमी**
**एकूण पाऊस : ८४५. ७४ मिमी**

## साजगाव येथील कारखान्यात वायूगळती

### तीन कामगार जखमी; एकाची प्रकृती गंभीर



**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

खालापुरातील साजगांव औद्योगिक वसाहतीतील फिनोजल कंपनीत केमिकलमध्ये वायूगळतीमुळे तीन कामगार गुदमरल्याची घटना गुरूवारी (दि. १३) सकाळी १०.३० वाजण्याच्या सुमारास घडली.

घटनास्थळी नायब तहसीलदार सुधाकर राठोड, सहाय्यक पोलीस निरिक्षक हरेश काळसेकर, केमिकल एक्सपर्ट धनंजय गिध तातडीने दाखल झाले. एका कामगाराची परिस्थिती चिंताजनक असल्याने खारघर येथे हालविण्यात आले, तर दोन जण खोपोली खासगी हॉस्पिटलमध्ये उपचार घेत आहे.

युनिव्हर्सल इंडस्ट्रियल इस्टेट येथे वाहनांसाठी ऑईल तयार करणारी फिनोजल कंपनी आहे. या कंपनीतील एका प्लँटमध्ये गुरूवारी कामगार केमिकलमध्ये पावडर टाकत असताना जास्त प्रमाणात पावडर पडल्यामुळे रिॲक्टरमधून पावडर प्लँटमध्ये पसरल्याने तीन कामगार गुदमरले. प्रशांत धाडवे (वय २५) याची परिस्थिती गंभीर असल्याने खारघर येथे हालविण्यात आले, तर सिद्धेश मल्हार (वय २०), राम सिंग (वय २१) यांच्यावर खोपोलीतील जाखोटीया हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहे.

घटनेची माहिती मिळताच, खोपोली अग्निशमन दलाचे जवान मोहन मोरे व त्यांचे पथक तत्काळ घटनास्थळी धाव घेत कारखान्यात आगीची घटना घडू नये यासाठी पाण्याचे बंब तयार ठेवले. जखमी कामगारांना मदत केली. या घटनेची माहिती मिळताच नायब तहसीलदार सुधाकर राठोड,सहाय्यक पोलिस निरिक्षक हरेश काळसेकर घटनास्थळी पोहचले त्यानंतर केमिकल एक्सपर्ट धनंजय गिध यांना बोलविण्यात आले.

केमिकल एक्स्पर्ट धनंजय गिध यांनी घटनास्थळी खात्री करून परिस्थिती नियंत्रणात असल्याचे सांगितले.



## भीमाशंकरला जाताना एसटी बसला अपघात; पाच प्रवासी जखमी

**पुणे : प्रतिनिधी**

कल्याण येथून भीमाशंकर येथे दर्शनासाठी जाणाऱ्या एसटी बसला गुरुवारी (दि. १३) सकाळी ९.३० वाजताच्या सुमारास अपघात झाला. पुणे जिल्ह्यात आंबेगाव तालुक्यातील गिरवली येथे असणाऱ्या ओढ्यावरून बस थेट २० फूट खोल खाली कोसळली. या अपघातात पाच जण जखमी झाले.

कल्याण येथून भीमाशंकर येथे निघालेल्या बसवरील चालकाचे नियंत्रण गिरवली गावाजवळ सुटले. त्यामुळे बस २० फूट खोल दरीत कोसळली. यात पाच जण जखमी झाले आहेत, तर अन्य सुखरूप आहेत.

## टोमॅटोचे दर कमी होण्याची शक्यता; नाफेड व एनसीसीएफ करणार खरेदी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टोमॅटोच्या दरवाढीमुळे जेरीस आलेल्या नागरिकांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने किरकोळ बाजारात किफायतशीर दरात विक्री करण्याचा निर्णय बुधवारी घेतला. या टोमॅटोची खरेदी महाराष्ट्र, आंध्र प्रदेश व कर्नाटकमधून सहकारी संस्था 'नाफेड' आणि राष्ट्रीय ग्राहक सहकारी महासंघाकडून (एनसीसीएफ) करण्यात येणार आहे.



मुसळधार पावसामुळे पुरवठा विस्कळीत झाल्याने अनेक भागांमध्ये किरकोळ बाजारात टोमॅटोचे दर २०० रुपये किलोपर्यंत पोहचले आहेत. जुलै, ऑगस्ट आणि ऑक्टोबर, नोव्हेंबरमध्ये टोमॅटोचे उत्पादन कमी होतेच, शिवाय चालू महिन्यात वाहतुकीशी संबंधित अडचणींमुळेही दर वाढल्याचे मंत्रालयाने म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर ज्या शहरांमध्ये किरकोळ बाजारातील किमती गेल्या एका महिन्यात राष्ट्रीय सरासरीहून अधिक आहेत, अशा ठिकाणी कमी किमतीत टोमॅटोचे वितरण केले जाईल, तसेच ज्या ठिकाणी टोमॅटोचा वापर जास्त आहे, अशा ठिकाणी वितरणासाठी प्राधान्य दिले जाईल, असे ग्राहक व्यवहार मंत्रालयाने सांगितले.

सध्या गुजरात, मध्य प्रदेश आणि इतर काही राज्यांमधील बाजारपेठेत होणारा टोमॅटोचा पुरवठा महाराष्ट्रातून विशेषत: सातारा, नारायणगाव आणि नाशिकमधून करण्यात येतो. हा पुरवठा या महिन्याच्या अखेरपर्यंत पुरेल, असे मंत्रालयाने म्हटले आहे. आंध्र प्रदेशातील मदनपल्ले (चित्तूर) येथेही वाजवी प्रमाणात आवक सुरू आहे. दिल्ली आणि लगतच्या भागात प्रामुख्याने हिमाचल प्रदेशातून टोमॅटोची आवक होते. याशिवाय टोमॅटो उत्पादनात दक्षिणेकडील राज्ये आघाडीवर आहेत.

नाशिक जिल्ह्यातून लवकरच नवीन पीक येण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे नजीकच्या काळात किमती कमी होण्याची अपेक्षाही मंत्रालयाने व्यक्त केली आहे.

## रसायनीतील तळवली येथे चारसुत्री भात लागवड



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यात शेतकऱ्यांनी पेरलेल्या भाताचे राब उत्तमप्रकारे झाले असून तालुक्याच्या ठिकाणी भात लागवड सुरू करण्यात आली आहे. रसायनी पाताळगंगा तळवली येथे असणारे शेतकरी देविदास मालकर यांच्या शेतामध्ये चारसुत्री भात लागवड हा कार्यक्रम हाती घेण्यात आले. ही लागवड एका दोऱ्यात घेऊन लागवड केली जाते. त्यास पट्टा लागवड असेही संबोधले जाते.

या लागवड पद्धतीत कमी मजुरांची आवश्यकता असते. शिवाय यामधून अधिक उत्पन्न मिळते. वनशेती तत्रांचा उपयोग करुन भातपिकांसाठी गिरिपुष्प हिरवळीच्या खताचा मर्यादित वापर झाडाचा पाला, अर्क त्यामुळे जमिनीची उत्पादन क्षमता वाढण्यास मदत होते. यासाठी तळवली येथे हा चारसुत्री कार्यक्रम हाती घेण्यात आला. ही लागवड ऐसेंरा तंत्रज्ञान असून शास्त्रीयदृष्ट्या कार्यक्षम असल्यामुळे लागवडीसाठी बी, मजूर, खत यांचा खर्च कमी होतो, असे अधिकाऱ्यांचे मत आहे.

उपविभागीय कृषी अधिकारी खोपोली नितीन फुलसुंदर, तालुका कृषी अधिकारी खालापूर सुनील निंबाळकर, मंडळ कृषी अधिकारी खालापूर जे. के. देशमुख, कृषी पर्यवेक्षक चौक नितीन महाडिक यांच्या मार्गदर्शनाखाली चारसुत्री भात लागवड कार्यक्रम घेण्यात आला. कृषी सहाय्यक प्रशांत कदम यांनी चारसुत्री भात लागवड बाबत मार्गदर्शन केले. या वेळी शेतकरी मधुकर मालकर, पोलीस पाटील मारुती पाटील, ग्रुप ग्रामपंचायत वडगांव सदस्य संदेश मालकर, देविदास मालकर, रुपेश मालकर, सागर मालकर, वैभव लभडे, महेंद्र मालकर, अतुल मालकर, ध्रुव मालकर, स्वप्नील मालकर, विष्णू मालकर आदी उपस्थित होते.

## सीकेटी महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगु काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (स्वायत्त) येथे प्रथम, द्वितीय, तृतीय वर्ष पदवी व पदव्युत्तर वर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा गुरुवारी (दि. १३) जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे स्फूर्तिस्थान स्व. चांगु काना ठाकूर यांच्या पुण्यस्मरण दिनाचे औचित्य साधून झाला.

### स्व. चांगु काना ठाकूर यांच्या पुण्यस्मरण दिनाचे औचित्य

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर तसेच प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. राजन वेळूकर उपस्थित होते.

या वेळी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, पनवेल मनपा माजी उपमहापौर सीताताई पाटील, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य व माजी सभागृह नेते परेश ठाकूर, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य संजय भगत व संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, भाजपच्या महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, माजी नगरसेविका दर्शना भोईर आदींची विशेष उपस्थिती लाभली. **(पान २ वर..)**

### व्यक्तिमत्त्व घडविण्याचे ध्येय ठेवा -लोकनेते रामशेठ ठाकूर

खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले की, फक्त पुस्तकी ज्ञान न घेता खऱ्या अर्थाने व्यक्तिमत्व घडवणे हे आयुष्याचे ध्येय असले पाहिजे. त्यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीकरता शुभेच्छा दिल्या.

# २०२८पर्यंत राज्याची अर्थव्यवस्था उंचावेल

## आर्थिक सल्लागार परिषदेचे अध्यक्ष चंद्रशेखरन यांचा विश्वास

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याची अर्थव्यवस्था एक लाख कोटी डॉलर्सचा टप्पा गाठण्याचे २०२८पर्यंतचे उद्दिष्ट साध्य करेल, असा विश्वास राज्य आर्थिक सल्लागार परिषदेचे अध्यक्ष आणि टाटा सन्सचे एन. चंद्रशेखरन यांनी बुधवारी (दि. १२) व्यक्त केला.

राज्य आर्थिक सल्लागार परिषदेचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन यांनी सल्लागार परिषदेच्या शिफारशींचा अहवाल मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सरकारला सादर केला. सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत आर्थिक सल्लागार परिषदेच्या वतीने सादरीकरण करण्यात आले.



महाराष्ट्राच्या सर्वांगीण, संतुलित विकासाचा ध्येय साध्य करणारा हा अहवाल आणि त्यातील शिफारशी असल्याचे चंद्रशेखरन यांनी सांगितले. राज्याच्या विविध क्षेत्रांतील संधीचा सर्वकष आढावा परिषदेने घेतला आहे. उद्योग क्षेत्राशी निगडित पाच आणि या सर्व क्षेत्रांना समांतरपणे जोडणाऱ्या तीन अशा एकूण आठ क्षेत्रांचा प्रामुख्याने विचार केला आहे. अहवाल आणि त्यातील शिफारशीपर्यंत पोहचण्यासाठी शेतकरी, उद्योजक, स्थानिक स्वराज्य संस्था, विविध उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांशी चर्चा करण्यात आली आहे.

महाराष्ट्राची कृषि, शिक्षण, ऊर्जा, पायाभूत सुविधा क्षेत्र, आरोग्य सेवा आणि पर्यटन या क्षेत्रांवरील आर्थिक तरतूदही दूरदृष्टीची आणि चांगली असल्याचे निरीक्षणही चंद्रशेखरन यांनी नोंदविले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाच्या 'फाईव्ह ट्रीलियन डॉलर्स' अर्थव्यवस्थेचे स्वप्न पाहिले आहे. याकरिता महाराष्ट्राने आपले योगदान देण्यासाठी या आर्थिक परिषदेची स्थापना केली.

परिषदेने कमीत कमीत वेळेत अहवाल सादर केल्याबद्दल मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रशंसा केली.

राज्य आर्थिक सल्लागार परिषदेचा अहवाल राज्याच्या प्रगतीची गुरुकिल्ली ठरेल. यातून महाराष्ट्राची अर्थव्यवस्था गरूड झेप घेईल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. या अहवालातील शिफारशींवर अंमलबजावणीकरिता कृती आराखडा तयार करण्यासाठी मित्रा संस्थेसह 'फास्ट-ट्रॅक' समिती काम करेल, अशी घोषणाही त्यांनी केली.

### राज्यात विकासाचा समतोल-मुख्यमंत्री

निर्मिती क्षेत्र, माहिती तंत्रज्ञानासारखे सेवा क्षेत्र, बांधकाम क्षेत्र, पर्यटन, आरोग्य सुविधा, कृषि आणि कौशल्य विकास या क्षेत्रांबाबतच्या शिफारशींचा समावेश आहे. या शिफारशींवर तितक्याच प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येईल. सल्लागार परिषदेने राज्यातील उद्योगासाठीच्या जमीन उपलब्धतेबाबतही चांगले निरीक्षण नोंदवले आहे. समृद्धी महामार्ग किंवा सोलर पार्क यासारखे प्रकल्प विकासाचा प्रादेशिक समतोल राखण्यासाठी उपयुक्त ठरतील, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

### दिशादर्शक अहवाल - उपमुख्यमंत्री

या अहवालातील शिफारशीमुळे महाराष्ट्र आता नि:संदिग्धपणे एक लाख कोटी डॉलर्स अर्थव्यवस्थेच्या दिशेने मार्गक्रमण करेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. मंत्रालयाच्या बाहेर आपल्या विकास दरवाढीची (जीडीपी ग्रोथ)ची माहिती देणारे घड्याळ (जीडीपी व्हॅल्यू क्लॉक) बसवण्यात येईल, असेही त्यांनी जाहीर केले.

# 'सौर प्रकल्पासाठी सबस्टेशननिहाय जमिनींची निश्चिती त्वरित करावी'



**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०मधील सौर प्रकल्पासाठी सबस्टेशननिहाय आवश्यक सुयोग्य जमिनींची निश्चिती योग्यता तपासून त्वरित करावी. या जमिनी नोडल एजन्सीला हस्तांतरित करण्यासाठी अभियान स्तरावर काम करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० संदर्भात आढावा बैठक झाली. या वेळी अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिव आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा, उपमुख्यमंत्री यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी हे उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही राज्याची महत्त्वाकांक्षी योजना आहे. वातावरण बदलाचे दुष्परिणाम मोठ्या प्रमाणात जाणवत असल्याचे आपण सर्वजण पाहत आहोत. या पार्श्वभूमीवर सौर ऊर्जेचा जास्तीत जास्त वापर वाढला पाहिजे. यातून उद्योगांना कमी दराने वीज मिळण्यासाठी तसेच पर्यावरण संवर्धनासाठीही मदत होणार आहे.

शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ही योजना अतिशय उपयुक्त ठरणार असल्याने या कामांना वेग देण्यात यावा. सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे. महाराष्ट्र राज्याची ही महत्त्वाकांक्षी योजना आता केंद्र सरकारनेही स्वीकारली आहे. या योजनेमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या पहिल्या पाच जिल्ह्यांना पारितोषिक देण्यात येणार असल्याचेही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वेळी सांगितले.

या योजनेंतर्गत कृषीभार असलेले २७३१ सबस्टेशन निश्चित करण्यात आले असून या सबस्टेशनची क्षमता १७ हजार ८६८ मेगावॅट आहे. यासाठी ८८ हजार ४३२ एकर जागेची आवश्यकता असून ३५ हजार एकर जमीन निश्चित झाली आहे. ५३ हजार एकर जमीन अजून निश्चित करणे अपेक्षित आहे. यासाठी महाराष्ट्र राज्य सोलर अॅग्रो कंपनी स्थापन करण्यात आली आहे. नाशिक, सोलापूर, अहमदनगर, नागपूर, धुळे-नंदुरबार ही पाच क्लस्टर पहिल्या टप्प्यात निवडण्यात आली असल्याची माहिती या वेळी देण्यात आली.

# ब्रिटनच्या उपउच्चायुक्तांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

## महाराष्ट्र गुंतवणुकीसाठी सर्वाधिक प्राधान्यक्रम असलेले राज्य -मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई : प्रतिक्रिया**

ब्रिटनचे उप उच्चायुक्त हरजिंदर कांग यांनी गुरुवारी (दि. १३) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सदिच्छा भेट घेतली. महाराष्ट्रात विविध क्षेत्रात गुंतवणुकीला मोठा वाव असल्याचे सांगत थेट परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या वेळी सांगितले.



शिष्टमंडळामध्ये जॉन निकेल, सचिन निकारगे यांचा समावेश होता. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, गेल्या अनेक दशकांपासून महाराष्ट्र आणि ब्रिटनमध्ये वाणिज्यिक संबंध आहेत. पर्यावरण, उत्पादन, शेती, पायाभूत सुविधा, आरोग्यसेवा, अक्षय ऊर्जा, जैवतंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, पर्यटन, औषधनिर्माण आणि शिक्षण या क्षेत्रात गुंतवणुकीच्या संधी आहेते.

ब्रिटनकडे या सर्व क्षेत्रांत जागतिक दर्जाचे प्रगत तंत्रज्ञान आहे. महाराष्ट्रात रस्ते, उत्तम पायाभूत सुविधा, कुशल मनुष्यबळ आहे. सकल राष्ट्रीय उत्पन्नात राज्याचे सर्वात मोठे योगदान असून थेट परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्राचा सिंहाचा वाटा असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

महाराष्ट्रात शिवराज्याभिषेक दिनाचा ३५०वा वर्षसोहळा साजरा करण्यात येत आहे. ब्रिटनमधील वस्तूसंग्रहालयात असणारी जगदंबा तलवार आणि वाघनखे महाराष्ट्रात आणण्यासंदर्भात सांस्कृतिक कार्य विभाग पाठपुरावा करीत आहे. त्याबाबत सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले.

## सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण करणार मुंबई-गोवा महामार्गाची पाहणी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण शुक्रवारी (दि. १४) रायगड जिल्हा दौऱ्यावर येत असून या वेळी ते मुंबई-गोवा महामार्गाची पाहणी करणार आहेत.

शुक्रवारी सकाळी ७.३० वाजता पनवेल येथे आगमन व मुंबई-गोवा महामार्गाच्या पाहणीस सुरुवात, सकाळी ७.३० ते ९.४५ वाजता पळस्पे ते इंदापूर या राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अंतर्गत येणाऱ्या कामाची पाहणी (८४ किमी.), सकाळी ९.४५ ते १०.१५ वाजता इंदापूर ते वडपाले पॅकेज-१ची पाहणी, सकाळी १०.१५ ते ११.१५ वाजता वडपाले ते भोगावे खुर्दे पॅकेज-२ची पहाणी, सकाळी ११.१५ ते १२ वाजता भोगावे खुर्दे ते कशेडी पॅकेज-३ची पाहणी करून कशेडी येथून मोटारीने चिपळूणकडे प्रयाण करणाार आहेत.

# दरड प्रवण क्षेत्रात बांबूच्या झाडांची लागवड

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

रायगड जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे, उपविभागीय अधिकारी अजित नेराळे यांच्या मार्गदर्शनाखाली बांबू जातीच्या झाडांची प्रायोगिक तत्त्वावर लागवड करण्याच्या उपक्रमाचा शुभारंभ खालापूर तालुक्याचे तहसीलदार आयुब तांबोळी आणि खालापूर तालुका वन अधिकारी कुलदीप पाटकर यांच्या हस्ते ग्रुप ग्रामपंचायत बीड-खुर्द येथे झाला.

आपत्ती व्यवस्थापन रायगड विभागाने अतिवृष्टीमुळे खालापूर तालुक्यातील ग्रुप ग्राम पंचायत बीड-खुर्द, खोपोली शहरातील सुभाष नगर आणि काजूवाडी या ठिकाणी दरड कोसळण्याची शक्यता व्यक्त केली आहे. हा गंभीर इशारा दिलेल्या गावात हा उपक्रम राबविण्यात आला.

या वेळी खालापूर तालुक्याचे निवासी तहसीलदार सुधाकर राठोड, उपसरपंच गौरव दिसले व त्यांचे सर्व सहकारी, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेचे सदस्य तसेच वनविभागाच्या कर्मचारी वर्गासह ग्रामस्थ उपस्थित होते.

वन संवर्धनातून निसर्गाचा कोप थांबविण्यासाठी प्रयत्न करण्याचा संकल्प हाती घेऊन बांबू लागवडीतून आपत्तीचा सामना करण्याची अभिनव संकल्पना प्रत्यक्षात साकार होण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन या निमित्ताने तहसीलदार आयुब तांबोळी यांनी केले आहे.



# आंतरराष्ट्रीय परिषदेकरिता डॉ. दिलीप पाटील यांची निवड

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठाचे माजी संचालक, डॉ. दिलीप पाटील यांची समूह विकास परिषदेच्या आंतरराष्ट्रीय परिषदेकरिता आशिया खंडातून निवड झालेली आहे. हि परिषद पोर्टलँड विद्यापीठ येथे १५ ते १९ जुलैदरम्यान होणार आहे.



जगभरातील १५० प्राध्यापक, संशोधक यांची उपस्थिती अपेक्षित असून, भारतातून डॉ. दिलीप पाटील हे भारतातील पंतप्रधान आवास योजनेच्या प्रगतीबाबत शोधनिबंध सादर करणार आहेत. डॉ. दिलीप पाटील हे १५ वर्षे आजीवन अध्ययन, आणि विस्तार विभाग, मुंबई विद्यापीठ येथे कार्यरत होते. यादरम्यान त्यांनी शेकडो महाविद्याल्यातील हजारो विद्यार्थ्यांना कुशलता विकास आणि व्यवसायभिकता याबाबत प्रशिक्षण दिलेले आहे.

डॉ. पाटील हे २५१४ ग्रामीण विकासातील वीस पुस्तकांचे लेखक असून त्यांनी २५ परिषदांमध्ये शोधनिबंधाचे वाचन केले आहे. डॉ. पाटील यांचे विविध स्तरावरून त्याचे अभिनंदन होत आहे.

## महायुतीमध्ये समन्वय साधण्यासाठी समिती

**मुंबई :** राज्यात तीन पक्षांचे ट्रिपल इंजीन सरकार आहे. भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस सत्तेत आहे. त्यामुळे अंतर्गत वाद निर्माण होऊ नयेत म्हणून महायुतीमधील तिन्ही पक्षांमध्ये समन्वय साधण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहेत.

समन्वय समितीत शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेसमधील प्रत्येकी चार सदस्यांचा समावेश असून १२ सदस्य समन्वय साधण्याचे काम करणार आहेत.



मुंबई : भाजप प्रदेश कार्यालयीन सचिव मुकुंद कुलकर्णी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष सय्यद अकबर, उद्योजक नवाज मणेर, समाजसेवक अन्वर शेख आदी उपस्थित होते.

पान १ वरुन

## धर्मयुद्ध जिंकण्यासाठी कुटनीती वापरावी लागते- उपमुख्यमंत्री फडणवीस

त्यामुळे दूरचा विचार करायचा असतो. विश्वास ठेवायचा असतो असेही फडणवीस यांनी म्हटले.

२०१९मध्ये पालघरची एक जागा आपल्या खासदारासहीत त्यांना (उद्धव ठाकरेंना) दिली होती. त्यानंतर युती झाली. ज्या बाळासाहेबांच्या खोलीबद्दल वारंवार ते सांगतात, त्याच खोलीत अमित शाह, उद्धव ठाकरे बसले होते. त्यानंतर मला बोलावले. मग पत्रकार परिषदेत मी एकट्याने बोलायचे, हे ठरले होते. मी ते मराठीत बोलून दाखवले, हिंदीत बोलून दाखवले. वहिनी आल्या आणि उद्धवजी म्हणाले, वहिनींसमोर बोलून दाखवा. मी त्यांनाही बोलून दाखवले. त्यानंतरच्या प्रत्येक सभेत देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वात निवडणूक होत असल्याचे उद्धव ठाकरेंनी स्पष्ट केले होते. शिवाय फडणवीसांना मुख्यमंत्री करायचे आहे, हे ते म्हणालेले, परंतु निवडणुकीनंतर मात्र ते बदलले. मुख्यमंत्री पद हवंय म्हणाले आणि सगळे दरवाजे उघडे आहेत असे म्हणाले. त्यानंतर काय झाले तर सगळ्या महाराष्ट्राला माहिती आहे.

मी जी उदाहरणे देतो आहे त्यात हे सांगू इच्छितो की, मी कुणालाही अफझल खान म्हटलेले नाही. आम्ही सगळे छत्रपतींचे मावळे आहोत. इतिहासाचे संदर्भ, त्यातले मतितार्थ लक्षात घ्यायचा असतो. परिस्थिती अनुरुप निर्णय घेऊन काम करावे लागते. कार्यकर्ते, सैनिक, मावळे यांच्या मनात नेतृत्वाबाबत विश्वास असतो तेव्हा अशा प्रकारचे धोरण यशस्वी होते असेही फडणवीस म्हणाले.

## सीकेटी महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

प्रमुख अतिथी डॉ. राजन वेळूकर म्हणाले की, माणसाने आयुष्यात नेहमी सक्रिय विद्यार्थी बनून सातत्याने अभ्यास करीत ज्ञानसंपादन केले पाहिजे, तसेच आई-वडिलांचे ऋण लक्षात ठेवले पाहिजे. दूरदृष्टी आणि परिश्रमाच्या माध्यमातून सभोवतालच्या परिस्थितीमध्ये अमुलाग्र बदल घडवून आणला पाहिजे व चांगली पुस्तके वाचायला शिकले पाहिजे. आयुष्यात प्रगतीसोबत विकास करणे महत्त्वाचे आहे. समाजासाठी काहीतरी करण्याची प्रवृत्ती जागृत करणे गरजेचे आहे.

या सोहळ्यामध्ये सर्व पालक व गुणवंत विद्यार्थ्यांचे चांगु काना ठाकूर कॉलेजचे प्राचार्य प्रो.(डॉ.) एस. के. पाटील यांनी कौतुक केले. स्व. चांगु काना ठाकूर यांचे पुण्यस्मरण आणि त्यांच्या आदर्श विचारांचा वारसा पुढे चालू ठेवण्यासाठी आयोजिलेल्या या कौतुक सोहळ्यामध्ये पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्य प्रो. (डॉ.) एस. के. पाटील यांनी महाविद्यालयाच्या आजपर्यंतच्या प्रगतीचा आढावा घेतला.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्टुडंट कौन्सिल व स्टुडंट वेलफेअर विभागाच्या चेअरमन डॉ. एम. ए. म्हात्रे, आयक्यूएसी विभागाचे समन्वयक डॉ. बी. डी. आघाव व महिला विकास कक्षाच्या चेअरमन डॉ. आर.डी.म्हात्रे यांनी विशेष परिश्रम घेतले. प्रा. डॉ. आर. व्ही. येवले, प्रा. डॉ. जि. एस. तन्वर, प्रा. ए. व्ही. पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले आणि आभारप्रदर्शन प्रा.डॉ.एस.एन.वाजेकर यांनी केले. कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत मान्यवरांनी कौतुक केले.

### दुखवटा

## विलास नि. साबळे

**कळंबोली :** माजी सैनिक विलास निवृत्ती साबळे यांचे रविवारी (दि. ९)दीर्घ आजाराने निधन झाले.



ते एक कर्तृत्ववान माजी सैनिक होते. पाकिस्तानबरोबर झालेल्या दोन युद्धात त्यांनी शौर्य गाजवले आहे. गेले चार महिने ते व्याधीने ग्रस्त होते. त्यांची अपोलो रुग्णालयात मृयत्यूशी झुंज चालू होती. त्यांची दोन्ही मुले डॉ. राकेश व दीपक यांनी वडिलांना वाचविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले, पण त्यांचे ते प्रयत्न व्यर्थ ठरले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन विवाहित मुले तसेच एक विवाहित कन्या असा परिवार आहे.



मुंबई : येथील प्रदेश कार्यलयात भाजप प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली अल्पसंख्यांक मोर्चाच्या महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षपदी ईद्रीस मुल्तानी यांची निवड करण्यात आली. या वेळी त्यांना शुभेच्छा देताना सय्यद अकबर उपस्थित होते.

## निवडक

### झाकण तुटल्याने अपघाताचा धोका

**पनवेल :** खारघर सेक्टर १८ सेंट्रल बँक ऑफ इंडियाकडून संजीवनी स्कूलकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर शालेय विद्यार्थी तसेच सकाळी चालण्यासाठी बाहेर पडणाऱ्या नागरिकांची गर्दी असते. अशातच या रस्त्यावरील एका गटारावरील झाकण मोडकळीस आले आहे. अशीच अवस्था पेठपाडा मेट्रो स्थानकाकडून सेक्टर ३४ कडे तसेच तळोजा कारागृहकडून शीघ्रकृती दलकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर झाली आहे. सध्या वाहतूक पोलिसांनी वाहनचालकाच्या निदर्शनास ही बाब यावी, म्हणून दगड ठेवले आहेत, पण रात्रीच्या वेळेस पायी जाणाऱ्या व्यक्तीचा पाय अडकून येथे अपघात होण्याची शक्यता असल्याने झाकण बसवण्याची मागणी होत आहे.

### पोलिसांनी लॅपटॉप शोधून दिला

**पनवेल :** लोकल रेल्वेने प्रवास करत असताना लॅपटॉप विसरलेल्या प्रवाशाला पनवेल रेल्वे पोलिसांनी तात्काळ पाहणी करून शोधून दिला आहे. याबद्दल रेल्वे पोलिसांची कौतुक होत आहे. कल्याणमधील रहिवाशी प्रतीक आरोटे हा पनवेल रेल्वे लोकलने प्रवास करत असताना तो त्याचा लॅपटॉप लोकलमध्ये विसरला होता. याविषयी त्याने पनवेल रेल्वे पोलिसांना माहिती दिल्यानंतर, त्यांनी तत्काळ लोकलमध्ये पाहणी करून लॅपटॉप लॅपटॉप हस्तगत करून प्रतीककडे सुपूर्द केला. त्याचप्रमाणे खारघरमधील अथर्व कांबळे यांचा मोबाइलही रेल्वे प्रवासादरम्यान पटरीमध्ये पडला होता. पनवेल रेल्वे पोलिसांना याबाबत माहिती मिळाल्यानंतर त्यांनी पोलिसांनी पाहणी करून मोबाइल शोधून अथर्व याला परत केला आहे.

### वाजेकर कॉलेजमध्ये लोकसंख्या दिन

**उरण :** राष्ट्रीय सेवा योजना व अर्थशास्त्र विभाग आयोजित जागतिक लोकसंख्यादिनानिमित्त मंगळवारी (दि. ११) व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कोकण ज्ञानपीठ कॉलेजचे डॉ. ए. आर. चव्हाण यांनी भाषणातून जागतिक लोकसंख्या वाढीचे परिणाम व उपाययोजना याविषयी संवाद साधला. प्राचार्य डॉ. पी. जी. पवार यांनी लोकसंख्या वाढीविषयी अभ्यासपूर्ण मत मांडले. प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख प्रा. राम गोसावी, राष्ट्रीय सेवा योजनेचे चेअरमन व अर्थशास्त्र विभाग प्रमुख यांनी केले. प्रा. श्रीकांत गोतपागार यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. सी. डी. धिंदळे यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजनेचे तसेच महाविद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते.



# बेशिस्त वाहनचालकांवर राहणार 'वॉच'

## नियमाचे उल्लंघन करणाऱ्यांवर होणार कारवाई ▌ पनवेल वाहतूक शाखेचा इशारा

**पनवेल : वार्ताहर**

विद्यार्थ्यांच्या वाहतूकीत सुरक्षिततेच्या दृष्टीने पनवेल वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक संजय पाटील यांनी पनवेल शहर विद्यार्थी वाहतूक संघटनेचे पदाधिकारी यांची बैठक बोलावली होती. या वेळी त्यांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने वाहतूक करताना घेण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या सूचना दिल्या तसेच तसेच वाहतूक नियमाचे उल्लंघन करणाऱ्या विरोधात कारवाईचा इशारा दिला.



पनवेल शहरासह तालुक्यात १५ जूनपासून शाळा सुरू झाल्या आहेत. शालेय विद्यार्थी वाहतूक करणारी बहुतांश वाहने नियमांना बगल देत विनापरवाना, विनानोंदणी, क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थी वाहून नेत असल्याच्या तक्रारी पनवेल वाहतूक शाखेला मिळाली होती. त्यानुसार पनवेल वाहतूक शाखेने कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांच्या वाहतूकीत सुरक्षिततेच्या दृष्टीने पनवेल वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक संजय पाटील यांनी पनवेल शहर विद्यार्थी वाहतूक संघटनेचे पदाधिकारी यांची बैठक बोलावली होती. या वेळी त्यांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने वाहतूक करताना घेण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या सूचना दिल्या तसेच तसेच वाहतूक नियमाचे उल्लंघन करणाऱ्या विरोधात कारवाईचा इशारा दिला. त्याचप्रमाणे वाहनचालकांना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी वाहतूक शाखा सकारात्मक असल्याचे आश्वासन उपस्थित पदाधिकाऱ्यांना दिले.

या वेळी महाराष्ट्र विद्यार्थी वाहतूक संघटनेचे अध्यक्ष हुंबने तसेच इतर वाहन चालक व संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## सीकेटी महाविद्यालयात जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त व्याख्यान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स (स्वायत्त) महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागाद्वारे मंगळवारी (दि.११) जागतिक लोकसंख्या दिनाचे औचित्य साधून व्याख्यानाचे व लोकसंख्या: शाप की वरदान या विषयावर भित्तीपत्रिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.



या वेळी महाविद्यालयाचे प्राध्यापक प्रो.डॉ. एस. के. पाटील, कलाशाखा प्रमुख व अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख प्रो. डॉ. बी. एस. पाटील, प्रा. के. एन. ढवळे व अर्थशास्त्र विभागाचे प्राध्यापक उपस्थित होते. प्रो. डॉ. ए. के. दिक्षीत हे प्रमुख वक्ते लाभले होते. यावेळी त्यानी भारताची वाढती लोकसंख्या,त्यामुळे उद्बाविणाऱ्या समस्या, लोकसंख्या नियंत्रणाचे उपाय यावर विद्यार्थ्यांना उद्बोधित केले. तसेच महाविद्यालयाचे प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी लोकसंख्या नियंत्रण ही काळाची गरज आहे व त्यासाठी आवश्यक उपयायोजानांची माहिती दिली.

या कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, आय. क्यू.ए.सी.समन्वयक डॉ.बी.डी. आघाव,रुसा समन्वयक डॉ.एस. एन. वाजेकर यांनी कौतुक केले. तसेच महाविद्यालयातील सर्व विद्याशाखांचे प्रमुख, विविध विभागाचे प्रमुख आणि सर्व प्राध्यापक वर्गाने या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजनाबद्दल शुभेच्छा दिल्या. या कार्याकार्मांच्या यशस्वी आयोजनासाठी कलाशाखा प्रमुख व अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख प्रो. डॉ. बी. एस. पाटील, प्रा. के. एन. ढवळे व अर्थशास्त्र विभागाचे प्राध्यापक यांनी अथक परिश्रम केले.

या कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर आणि सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

## उरण महाविद्यालयात व्यवसाय, नोकरीविषयक मार्गदर्शन

**उरण : रामप्रहर वृत्त**

महाविद्यालयांमध्ये ब्रेनस्टॉर्म इन्स्टिटयूट नवी मुंबई अंतर्गत ग्रॅज्युएशन नंतर रोजगार नोकरी व्यवसाय या संदर्भामध्ये मार्गदर्शन करण्यात आले. पदवी प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी कोणकोणत्या प्रकारचे व्यवसाय करावेत, त्याचबरोबर कोणत्या प्रकारच्या नोकऱ्या उपलब्ध आहेत, त्यासाठी आपण कोणत्या प्रकारचे प्रशिक्षण घेतले पाहिजे याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमासाठी महाविद्यालयातून १०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. सदर कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बळीराम गायकवाड सर आणि माजी प्राचार्य शामा सर यांच्या मार्गदर्शनाने उस्फुर्तपणे झाला. तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या देखील बहुमोलाचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले. हा कार्यक्रम करिअर गायडन्स सेल च्या अंतर्गत आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमामध्ये ज्येष्ठ प्राध्यापक वी. एस. इंदुरकर, आयक्यूएससी कॉर्डिनेटर डॉ. ए. आर. चव्हाण, एनएसएस कार्यक्रमाधिकारी डॉ. हिंगमिरे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. पराग कारुळकर, आदी सर्वांचे उत्तम सहकार्य लाभले. प्रस्तावना डॉ. जगताप यांनी केले आभार प्रा. ए. के. गायकवाड यांनी मानले.



## फुंडे हायस्कुल येथे स्वच्छता उपक्रम



**उरण : रामप्रहर वृत्त**

भारत पेट्रोलियम कंपनीच्या 'एमयुपीएल' पाईपलाईन विभागातर्फे व्यावसायिक आणि सामाजिक जाणिवेतून विविध सामाजिक आणि विधायक उपक्रम राबविण्यात येत असतात. त्याचाच एक भाग म्हणून रयत शिक्षण संस्थेच्या उरण फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक शाळेत स्वच्छता उपक्रम-२०२३ बुधवारी (दि. १२) आयोजित करण्यात आला.

या वेळी भारत पेट्रोलियमचे अधिकारी संदीप टकले, वरिष्ठ प्रबंधक, एमयूपीएल, मंगेश जाधव, सहाय्यक प्रबंधक रवींद्र कटकदौंड, प्रबंधक तसेच फुंडे हायस्कुल स्थानिक स्कूल कमिटी चेअरमन कृष्णाजी कडू, प्राचार्य एम. एम. म्हेत्रे, पर्यवेक्षक एस. जी. म्हात्रे, ऑफिस प्रमुख एम. पी. तुमडे, शिक्षक,विद्यार्थी उपस्थित होते.

या विधायक कार्यक्रमास भारत पेट्रोलियम अधिकारी वृंद यात कार्यकारी संचालक प्रदीप गोयल, मुख्य महाव्यवस्थापक संजीव काकन, विभाग प्रमुख (पश्चिम क्षेत्र) नीलेश तिमोथी यांचे विशेष सहकार्य आणि मार्गदर्शन लाभले.

'एमयूपीएल' पाईप लाईन विभागाकडून प्रभात फेरीचे आयोजन केले. शालेय परिसरात वृक्षारोपण करून, वृक्ष रोप वाटप केले.विद्यार्थ्यांसाठी स्लोगन, चित्रकला, निबंध स्पर्धेचे आयोजन केले.तसेच विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे देण्यात आली. शिक्षक वर्गासाठी ज्यूट बॅग, तर शाळेसाठी कचरा कुंडी, झाडू तसेच स्यानीटायझेशन किटचे वाटप करण्यात आले. या वेळी शाळेच्या वतीने 'बीपीसीएल' कंपनीचे मनापासून आभार मानण्यात आले. तसेच प्लास्टिकचा वापर टाळण्यासाठी व स्वच्छतेचे महत्व सांगणारी शपथ घेण्यात आली. तसेच विद्यार्थी, शिक्षक तसेच उपस्थितांना पेट्रोलियम पाइपलाइनचे महत्त्व आणि सुरक्षेसंदर्भात माहिती देण्यात आली.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात स्व. चांगू काना ठाकूर यांची पुण्यतिथी

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात गुरुवारी (दि. १३) स्व. चांगू काना ठाकूर साहेब यांची पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली.

या पुण्यतिथीच्या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रुपेंद्र गायकवाड व रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निशा नायर यांनी उपस्थित राहून स्व. चांगू काना ठाकूरसाहेब यांच्या प्रतिमेस पुष्पार्पण करून श्रद्धांजली अर्पण केली तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून स्व. चांगू काना ठाकूर साहेब यांच्या प्रतिमेस पुष्पार्पण करून सर्वांनी श्रद्धांजली अर्पण केली.

या पुण्यतिथीच्या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. प्रतीक्षा पाटील (समन्वयक, स्टाफ वेल्फेअर समिती) यांनी केले तसेच प्रा. डॉ. दीपिका हसीजा, प्रा. डॉ. नीलम लोहकरे, प्रा. प्रथमेश उदेकर व प्रा. राहुल कांबळे तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.



## पनवेल परिसरात अवैध व्यवसायांचे प्रमाण वाढले

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात तृतीयपंथीयांकडून घोळक्याने रस्त्यावरच प्रवासी, चालकांसोबत अश्लील चाळे करताना दिसून येत आहेत. त्यातून ठिकठिकाणी त्यांचे अवैध धंद्याचे अड्डे तयार झाले आहेत. अशा ठिकाणांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

पनवेल परिसरात मोठ्या प्रमाणात तृतीयपंथीयांचे प्रमाण वाढताना दिसत आहे. हे तृतीयपंथी कळंबोली, नवीन पनवेल ब्रिजखाली, पंचमुखी सिग्नलवर भीक मागताना दिसून येत आहेत. तर पनवेल ते तळोजा रस्त्यावर तसेच खारघर-रोडपाली येथील झाडा-झुडपात तृतीयपंथीयांकडून देहविक्री चालत असल्याने त्यांचे अड्डे तयार झाले आहेत. रस्त्यालगतच उभे राहून ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी त्यांच्याकडून अश्लील चाळे केले जात आहेत. त्यातून लूटमारीच्या घटना घडत आहेत.

या तृतीयपंथीयांचा पनवेल रेल्वे स्थानकात मुक्त वावर असून पनवेल ते मानसरोवरपर्यंत लोकल रेल्वेमध्ये प्रवाश्यांकडून जबरदस्तीने पैश्याची मागणी करत असतात. तर पैसे न देणाऱ्या प्रवाश्यांसोबत भांडणापर्यंत त्यांची मजल जाते. याबाबत वारंवार तक्रार करुनही कठोर कारवाई करण्यात येत नसून त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

## उरण तालुक्यात भातशेतीच्या लावणीला प्रारंभ

**उरण : प्रतिनिधी**

यंदा पावसाने जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात प्रारंभ केला होता. मात्र त्यांनतर २० दिवस दडी मारल्याने बळीराजानी पेरणी केलेली भाताची रोपे वाढण्यास दिरंगाई झाली, परंतु उशिरा पाऊस झाल्याने एकेकाळी भाताचे कोठार म्हटले जाणाऱ्या उरण तालुक्यात भातशेतीच्या लागवडीला प्रारंभ झाला आहे. पिढ्यानंपिढ्या आपल्या पूर्वजांनी राखून ठेवलेल्या शेतीची मशागत करण्यासाठी तालुक्यातील बळीराजा सरसावला असल्याचे ग्रामीण भागात सर्वत्र चित्र दिसत आहे.

यामध्ये उरण तालुक्यातील कोप्रोली, पाणदिवे, पिरकोन, पाले आवरे, गोवठणे, सारडे, वशेणी, पुनाडे, चिरनेर, कलंबूसरे, मोठीजुई, मोठेभोम, टाकीगांव, विंधणे, दिघोडे, धाकटीजूई, बोरखार, केगाव, नागाव व म्हातवली आदी गावांचा समावेश आहे. जेएनपीएच्या अनुषंगाने तालुक्यात विविध प्रकल्प आले. या प्रकलपांसाठी निम्याहून अधिक जमीन संपादित करण्यात आली आहे. तरीही शिल्लक असलेल्या जमिनीची मशागत आजही येथील शेतकरी करतांना दिसत आहेत.

जून महिन्यात वरुणराजांनी पावसाला उशीर केला, मात्र चातकासारखी वाट बघणाऱ्या शेतकऱ्यांनी घाबरून न जाता भातशेतीच्या रोपांची नित्यानेमाने देखभाल करून लागवडीला आलेल्या भाताच्या रोपांची लागावडीला प्रारंभ केला आहे. यामध्ये कोप्रोली येथील शेतकरी बाळकृष्ण नारायण पाटील या शेतकऱ्याने २८ गुंठे क्षेत्रात सालाबादप्रमाणे भाताची रोपे जलद गतीने वाढवून भाताच्या रोपांची लावणी तालुक्यात सर्वप्रथम करण्यामध्ये यश मिळविले आहे.



## वीर वाजेकर महाविद्यालयातून 'बीपीएस'साठी ११ जणांची निवड

**उरण : वार्ताहर**

महाविद्यालयाच्या प्लेसमेंट सेलच्या विद्यमाने गुरुवार (दि १३)रोजी जुटाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसच्या वतीने महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांसाठी सेमिनार व नोकर भरतीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये बीपीएस पदासाठी ११ जणांची निवड करण्यात आली आहे.



सेमिनार व नोकर भरती कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख प्लेसमेंट सेलचे चेअरमन डॉ. आमोद ठक्कर यांनी केले. प्राचार्य डॉ. पी. जी. पवार यांनी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबवित असलेल्या उपक्रमांची माहिती करून दिली. ह्या विद्यार्थ्यांचे समुपदेशन रेश्मा बचवानी कॅम्पस रीकृटर टीसीएस ह्यांनी केले तसेच विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक मुलाखती घेतल्या. या उपक्रमात सुमारे ८२ इच्छुक उमेदवार उपस्थित होते.

प्रत्यक्ष मुलाखतीतून त्यांचे कल व आवड लक्षात घेऊन व त्यांचे शैक्षणिक गुणवत्ताही लक्षात घेऊन प्रत्यक्षात ३८ विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा पूर्वी चौहान टॅलेंट एक्विझीशन ग्रूप टीसीएस यांनी घेतली या परीक्षेतून निवड झालेल्या २५ योग्य उमेदवारांच्या वैभवी बालया व अमीता शेट्टी एचआर टीसीएस यांनी ११ उमेदवारांची निवड केली. ह्या उमेदवारांच्या कागदपत्र पडताळणी झाल्यावर त्यांना प्रत्यक्ष नेमणूक देण्याची प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

आभार उपप्राचार्य डॉ. विलास महाले यांनी मानले. या कार्यक्रमासाठी मुलाखती व लेखी परीक्षेचे नियोजन पंकज भोये व प्रा. भूषण ठाकूर यांनी केले. सूत्रसंचालन दीक्षिता म्हात्रे व प्रांजल भोईर यांनी केले.

## संपादकीय

# टोमॅटो झाले लालेलाल!

टोमॅटोचे दर अधून मधून वाढतात, तसे ते कोसळतातही. त्यात नवे असे काही नाही, पण यंदा टोमॅटोची आवक प्रचंड प्रमाणात घटली. मध्यंतरी झालेल्या अवकाळी पावसामुळे टोमॅटोची लागवड तुलनेने कमी झाल्याने ही भाववाढ बघायला मिळत आहे.

**सुरुवातीचा पाऊस पडून गेल्यानंतर भाज्या नेहमीच महागतात. विशेषत: जून-जुलैच्या काळात टोमॅटोचे दर साधारणपणे भडकतात. यंदाचे वर्षही त्याला अपवाद नाही. यंदा तर टोमॅटोने नागरिकांच्या तोंडचे पाणी पळवले आहे. नेहमी वीस-पंचवीस रुपये प्रतिकिलोच्या भावाने उपलब्ध असलेले टोमॅटो सध्या १२० ते १६० रुपये प्रति किलोचा भाव खाऊन जात आहेत. टोमॅटोशिवाय भारतीय स्वयंपाकघरात रंगत येत नाही. टोमॅटोमुळे उपाहारगृहे आणि हॉटेलचालकांचेही धाबे दणाणले आहे. काही दिवस वाट पाहून पदार्थांचे दरही वाढवावे लागतील, अशी भीती हॉटेल चालक व्यक्त करू लागले आहेत. टोमॅटोचे वाढते दर आणि घटता दर्जा यांमुळे मॅकडोनल्ड्स इंडियाच्या उत्तर आणि पूर्व भारतातील उपाहारगृहांनी बर्गरमध्ये टोमॅटोचा वापर बंद केला आहे. 'आमच्या गुणात्मक निकषांप्रमाणे टोमॅटोचा दर्जा नसून त्याचे दरही वाढले आहेत. त्यामुळे तूर्तास आम्ही आमच्या पदार्थांमध्ये टोमॅटोचा वापर थांबवला आहे,' असे या कंपनीने म्हटले आहे. नागरिकांची गैरसोय होते हे खरे आहे, पण कधी नव्हेत ते महाराष्ट्रातील टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांना चांगला पैसा मिळाल्याने ते आनंदित झाले आहेत, ही त्यातल्या त्यात समाधानाची बाब. जुन्नरनजीकच्या एका शेतकऱ्याने तर टोमॅटो विकून लाखोंची कमाई केल्याचे वृत्त आहे. गेल्या दहा दिवसांत हे दर जवळपास चार पटीने वाढले आहेत. यावर्षी जानेवारी महिन्यापासून टोमॅटोच्या दरांत ४४५ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली आहे. त्यामुळे देशभरातील ५०हून अधिक शहरांत टोमॅटोचे दर शंभरीपार पोहचले आहेत. यातील अनेक शहरे उत्तर भारतातील आहेत. चेन्नईमध्ये टोमॅटो १००-१३० रुपयांवर पोहचल्यानंतर तामिळनाडू सरकारने शिधावाटप केंद्रांवर ६० रुपये किलो दराने तो उपलब्ध करून दिला आहे. तसे काही आपल्या महाराष्ट्रात करता येईल का, याचा विचार व्हायला हरकत नाही. टोमॅटो आणि कांदा ही दोन पिके देशातील सामान्य नागरिकांशी भावनिकदृष्ट्या जोडलेली आहेत. या दोन जिनसांचा वापर दैनंदिन स्वयंपाकात मोठ्या प्रमाणात असल्याने त्यांचे भाव वाढल्याची जनमानसांत लगेचच प्रतिक्रिया दिसून येते. अशा भाववाढीचा अनेक पक्षांना निवडणुकांमध्ये फटका बसल्याचेही याआधी घडले आहे. भाज्यांचे भाव वाढल्यास रिझर्व्ह बँकेच्या महागाई नियंत्रणात ठेवण्याच्या उपाययोजनांवर परिणाम होतो. जूनच्या २४ तारखेपर्यंत देशभरात टोमॅटोचे सरासरी दर २० ते २५ रुपये किलो इतके होते. ते ३० जून रोजी १०० रुपये प्रति किलोवर पोहचले, असे केंद्रीय ग्राहक व्यवहार, अन्न आणि नागरी पुरवठा मंत्रालयाच्या संकेतस्थळावरील नोंदी सांगतात. जूनच्या शेवटच्या आठवड्यात देशभरातील बाजारांत ६२८४२ टन टोमॅटोची आवक झाली. ही गेल्या चार वर्षांतील सर्वांत कमी आवक होती असे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे. टोमॅटोबरोबरच अनेक भाज्याही अचानक भडकल्याने जनसामान्यांनी खायचे तरी काय, असा प्रश्न पडू लागला आहे. मोसमी पाऊस सुरू झाल्याने भाज्यांचे भाव आणखी कडाडले आहेत. काही दिवस ही भाववाढ सहन करावी लागेल. नंतर टोमॅटोचे दर खाली येतील, असे सांगितले जाते.**

# रायगड जिल्ह्यात लालपरीला महिलांमुळे संजीवनी

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

राज्य सरकारने एसटी प्रवास भाडयात महिलांना ५० टक्के सवलत दिल्यामुळे प्रवशी वाढू लागले आहेत. रायगड जिल्हयात एसटीने प्रवास करणारया महिलांच्या संख्येत जवळपास ५० टक्क्यांनी वाढ झाली आहे. मागील अडीच महिन्यात जिल्हयात ४७ लाख ८७ हजार ९९१ इतक्या महिला प्रवाशांनी या सवलत योजनेचा लाभ घेत प्रवास केला आहे. त्यातून एसटीला १० कोटी ५९ लाख ५२ हजार ५८५ रुपये इतके उत्पन्न मिळाले आहे.महिला प्रवाशांमुळे लालपरिला संजीवनी मिळाली आहे.

गाव तीथे रस्ता आणि रस्ता तिथे एसटी असे शासनाचे धोरण होते. त्यामुळे गावागावात एसटी गेली. एसटी सेवेमुळे ग्रामीण भागात दोन पिढ्या शिकल्या. माध्यमिक शिक्षणाची सुविधा गावात नव्हती. त्यासाठी तालुक्याच्या गावताला जावे लागत असे. पायी जावे लागत असे. त्यामुळे इच्छा असुनही शिक्षण अर्धवट सोडावे लागले. एसटी गावात येऊ लागल्यामुळे तालुक्याच्या गावात जाणे शक्य झाले. शिक्षणासठी मुल तालुक्याचा गावाला जाऊ लागली. ग्रामीण भागातील मुल शिकू लागली. लांबपल्ल्याच्या प्रवासाठी देखील एसटी हा एकमेव पर्याय होता. एसटीचा प्रवसा म्हणजे सुरक्षीत प्रवास . त्यामुळे एसटी उशीरा आली तरी लोक एसटीची वाट पाहत असत. वाट पाहीन पण एसटीनेच जाईन असे म्हटल जात असे, परंतु मध्यतरीच्या काळात गावागावात खाजगी प्रवासी वाहतुक सुरू झाली. त्यामुहे लोकांना पर्याय निर्माण झाले. घराघरात दुचाकी आल्या. त्यामुळे एसटीसाठी कुणी थांबेनात. एसटीच्या प्रवाशी संख्येत घट झाली. एसटीचे उत्पन्न घटले. एसटी तोट्यात जाऊ लागली. एसटी नफ्यात आणण्यासाठी अनेक योजना राबविण्यात आल्या. महाराष्ट्र राज्याच्या



२०२३-२४ च्या अर्थसंकल्पामध्ये महिलांना एसटीच्या सर्व प्रकारच्या बसेसच्या तिकीट दरात ५० टक्के सवलत देण्याची घोषणा करण्यात आली. त्या अनुषंगाने १७ मार्च २०२३ पासून एसटी महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बसेस मधून महिलांना तिकीट दरात ५० टक्के सवलत देण्याची योजना कार्यान्वित करण्यात आली. रायगड जिल्हयात या सवलत योजनेला महिलांकडून प्रचंड प्रतिसाद मिळतो आहे. कामानिमित्त घराबाहेर पडणारया महिलांची पावले आता या सवलतीमुळे खाजगी प्रवासी वाहनांऐवजी एसटीकडे वळली आहेत. मागील काही दिवसात एसटी बसेसमध्ये पुरूषांपेक्षा महिलांची संख्या अधिक दिसते.

एप्रिल मध्ये १५ लाख ३२ हजार ८८० इतक्या महिला प्रवाशांनी या योजनेचा लाभ घेतला. यातून ३ कोटी १६ लाख ४८ हजार ६१३ रुपये उत्पन्न मिळाले. मे महिन्यामध्ये महिला प्रवाशांची संख्या वाढून ती १७ लाख ७० हजार ४५ झाली. त्यातून चार कोटी १७ लाख १७ हजार ४१० उत्पन्न मिळाले. तर जून महिन्यात १४ लाख ८५ हजार ६६ महिलांनी प्रवास केला त्यातून तीन कोटी २५ लाख ८६ हजार ५६२ इतके उत्पन्न एसटीच्या रायगड विभागाला मिळालेही संख्या पूर्वीच्या तुलनेत ५० टक्क्यांनी अधिक असल्याचा दावा एसटी च्या अधिकारयांनी केला आहे.

समाजाचा मुख्य घटक असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना दिल्या जाणाऱ्या अमृत मोफत प्रवास योजनेला मोठा प्रतिसाद मिळाला आहे. ७५ वर्षांच्या ज्येष्ठ नागरिकांना हा लाभ दिला जातो. जिल्ह्यात मागील तीन महिन्यांत चार लाख ५३ हजार ७२५ ज्येष्ठ नागरिकांनी सवलतीचा लाभ घेत प्रवास केला. त्यातून एसटीला दोन कोटी दोन लाख २७ हजार ४३० रुपये उत्पन्न मिळाले. एप्रिलमध्ये १ लाख ५१ हजार ७०१ इतक्या ज्येष्ठ नागरिकांनी एसटीने प्रवास केला. त्यातून ६२ लाख ८८ हजार ६३७ रुपये एवढे उत्पन्न मिळाले. मे महिन्यात एक लाख ५४ हजार ११५ इतक्या ज्येष्ठ नागरिकांनी प्रवास केला. यातून राज्य परिवहन महामंडळाच्या रायगड विभागाला ७१ लाख ५१ हजार २५६ रुपये एवढे उत्पन्न मिळाले. जूनमध्ये एक लाख ४७ हजार ९०९ इतक्या ज्येष्ठ नागरिकांनी प्रवास केला आणि त्यातून ६७ लाख ८७ हजार ५३७ रुपये इतके उत्पन्न मिळाले आहे.

कोरोना काळात एसटी वाहतुक बंद होती. खजगी प्रवशी वाहतुक करणाऱ्यांना क्षमतेच्या पन्नास टक्के प्रवशी घेऊन प्रवास करण्यास परवानगी देण्यात आली. त्यामुळे खाजगी प्रवासी वाहतुक करणाऱ्यांनी दर दुप्पट वाढवले. वास्तविक हे दर कोराना काळासाठी ठेवण्यात आले होते, परंतु कोरोनाचे निर्बंध उठवल्यानंरत देखील अलिबाग तालफक्यातील सहा असानी रीक्षावाल्यांनी आपले दर कमी केले नाहीत. एसटी वेळेत येत नाही म्हणून ग्रामीण भागतील लोक जास्त पैसे देऊन खासगी गाड्यांनी जात होते. यातून प्रवास करणाऱ्यांमध्ये महिला प्रावाशांचीच संख्या जास्त होती. आता राज्य शासनाने माहिला प्रवाशांना एसटीचे दार पन्नास टक्के केल्यामुळे एसटीसाठी प्रवासी थांबू लागले. ज्या महिला खाजगी वाहनाने प्रवसा करत होत्या त्या आता एसटीने प्रवास करू लागल्या आहेत.

अलिबाग - पनवेल मार्गावरदेखील खाजगी वाहतुक करणारे जादा दर आकारत होते. आता या मार्गाव निम्म्या दरात प्रवास करता येत असल्यामुळे महिला प्रवाशांची संख्या वाढली. रिकाम्या जाणाऱ्या एसटी बसेस आत प्रवाशांनी भरू लागल्या आहेत. राज्या शासनाच्या एका चांगल्या निर्णयामुळे महिला प्रवाशांची सोय झाली त्याचबरोबर एसटीचे दखेली उत्पन्न वाढले. लालपरिला संजीवनी मिळाली.

# नवीन विहिरीसाठी अडीच लाख, दुरुस्तीसाठी ५० हजारांचे अनुदान

पाणी, जमिनीत ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आणि शेतकऱ्याला सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य सरकारने बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी राबवण्यात आली आहे. या योजनेमुळे कोरडवाहू शेतकऱ्यांना दिलासा आणि मदत मिळणार . पूर्णपणे पावसाच्या पाण्यावर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांना या योजनेमुळे पाणी स्वतः च्या शेतात करायला मदत मिळणार आहे.



**लाभासाठी अशा आहेत अटी** जातीचा दाखला, ७/१२, वार्षिक उत्पन्न अडीच लाखाच्या आत, उत्पन्नाचा दाखला, जमीन ०.२० हेक्टर ते ६ हेक्टर पर्यंत (नवीन विहिरीसाठी किमान ०. ४० हेक्टर) असणे आवश्यक आहे. शेतीला बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेंतर्गत शेतकऱ्यांना नवीन विहिरीपासून शेततळे, विहिरीची दुरुस्ती, ठिबक, तुषार सिंचनासाठी अनुदान दिले जाते. लाभार्थी शेतकऱ्यांनी या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन केले जात आहे.

पाणी मिळावे यासाठी शेतात विहीर बांधण्यास शासनामार्फत अनुदान दिले जाते. बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेंतर्गत शेतकऱ्यांना नवीन विहीरीसाठी अडीच लाख रुपये अनुदान दिले जाणार आहे. लाभार्थी शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज ऑनलाईन करायचा आहे. अधिक माहितीसाठी जवळच्या कृषि विभागाच्या कार्यालयाशी संपर्क करावा.

**-उज्वला बाणखेले,**
**जिल्हा कृषी अधिकारी**

## बदलते तंत्रज्ञान

# इन्स्टाग्रामवर लवकरच मिळणार एक खास फीचर




इन्स्टाग्रामने अलीकडेच थ्रेड्स ॲप लाँच केले आहे. या ॲपने काही काळातच ८० दशलक्ष युजर्सही ओलांडले आहेत. दरम्यान थ्रेड्स ॲप इन्स्टाग्रामशी जोडलेले आहे आणि तुम्ही इन्स्टाग्राम आयडीच्या मदतीने त्यावर लॉग इन करू शकता. दरम्यान, याशिवाय कंपनी इन्स्टाग्राम ॲपला आणखी ताकदवर करीत आहे. कंपनी एका नवीन फीचरची चाचणी करीत आहे.

नवीन फीचर लाईव्ह ॲक्टिव्हिटी म्हणून ओळखले जाईल. कंपनी सध्या त्याची आयओएसवर चाचणी करीत आहे. या फीचर अंतर्गत जेव्हाही तुम्ही इन्स्टाग्रामवर एखादी पोस्ट किंवा व्हिडीओ पोस्ट कराल तेव्हा तुम्हाला लॉक आणि होमस्क्रीनवर पोस्टिंगची लाईव्ह ॲक्टिव्हिटी दिसेल की ती किती पूर्ण झाली आहे.


आतापर्यंत तुम्ही कोणतीही पोस्ट किंवा व्हिडीओ किंवा रील टाकल्यास ती किती टक्के अपलोड झाली हे पाहण्यासाठी पुन्हा पुन्हा ॲप उघडावे लागते. ॲप उघडल्याशिवाय नेमकं कळत नाही, पण आता लवकरच ळजड वापरकर्त्यांना लाइव्ह ॲक्टिव्हिटी फीचर आल्यानंतर लॉकस्क्रीनवर पोस्टचे अपडेट मिळेल. सध्यातरी हे ॲप फक्त आयओएस वापरकर्त्यांसाठी उपलब्ध असेल.

इन्स्टाग्रामने नुकतेच युजर्सना रील्स डाउनलोड करण्यासाठी 'डाउनलोड' हा एक खास पर्याय दिला आहे. ही सुविधा सध्या यूएस युजर्ससाठी सुरू करण्यात आली आहे. वापरकर्ते आता एका क्लिकवर थेट पब्लिक रील्स डाउनलोड करू शकतात. याव्यतिरिक्त मेटाने गेल्या महिन्यात आणखी एक घोषणा केली की ती म्हणदे 'व्हाय ऍम आय वॉचिंग दिस?', तर इन्स्टाग्राम आणि फेसबुक रील्समध्ये अधिक पर्यायाचा विस्तार करीत आहे. कंपनी इन्स्टाग्रामच्या एक्सप्लोर पेजवरवरील फीचर उपलब्ध करून देत आहे, जेणेकरून यूजर्सना समजू शकेल की त्यांना एखादी विशिष्ट पोस्ट का दाखवली जात आहे. एकूणच वाढत्या स्पर्धेच्या जमान्यात सोशल मीडियाही नवनवी फिचर्स आणून यूजर्सना आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न करीत आहेत.

# थोर समाजसुधारक गोपाळ आगरकर

एक बुद्धिप्रामाण्यावादी विचारवंत आणि थोर समाजसुधारक गोपाळ गणेश आगरकर यांची आज जयंती. त्यांचा जन्म १४ जुलै १८५६ रोजी सातारा जिल्ह्यातील टेंभू या गावी गरीब घराण्यात झाला. हालअपेष्टांना तोंड देत कराड, रत्नागिरी, अकोला आणि पुणे येथे राहून ते एमए झाले. अकोल्याच्या विष्णू मोरेश्वर महाजनींचे त्यांना मार्गदर्शन लाभले.

महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी पुण्यात निर्माण केलेल्या जहाल विचारांच्या राष्ट्रवादी पंथास गोपाळ आगरकर हे लोकमान्य टिळकांसह जाऊन मिळाले. लोकशिक्षण आणि लोकजागृती करण्यासाठी या तिघांनी पुण्यात न्यू इंग्लिश स्कूल स्थापन केले (१८८०) तसेच केसरी आणि मराठा (इंग्रजी) ही वर्तमानपत्रे चालू केली (१८८१). न्यू इंग्लिश स्कूलमध्ये आगरकरांनी अध्यापनाचे काम केले. त्याचप्रमाणे 'केसरी'च्या संपादनाची जबाबदारी स्वीकारून परिणामकारक लेखन आणि कुशल संपादन यांच्या जोरावर अल्पावधीतच लोकप्रियता प्राप्त करून दिली. न्यू इंग्लिश स्कूलच्या चालकांनी स्थापन केलेल्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य (१८९२)



**निमित्त**

म्हणूनही त्यांनी अखेरपर्यंत काम केले.

महाविद्यालयीन जीवनातच जेरेमी बेंथम, जॉन स्ट्यूअर्ट मिल आणि हर्बर्ट स्पेन्सर यांच्या विचारांनी त्यांचे मन संस्कारित झाल्यामुळे आगरकरांचा दृष्टीकोन उदारमतवादी, बुद्धिप्रामाण्यवादी आणि अज्ञेयवादी झालेला होता. याच दृष्टिकोनातून तत्कालीन समाजाची शिलावस्था त्यांना जाचत होती व समाजजागृती करण्याची आवश्यकता त्यांना वाटत होती. क्रांतिकारक सामाजिक विचारांच्या प्रतिपादन-प्रसारासाठी सुधारक हे पत्र त्यांनी काढले (१८८८). त्यात राजकीय व अर्थशास्त्रविषयक लेखही येत.

बुद्धिवादी दृष्टीकोनातून समाजजीवनाचे विश्लेषण करून अन्याय्य रूढी आणि परंपरा यांच्यावर त्यांनी कडाडून हल्ले चढविले. बुद्धीच्या निकषांखेरीज अन्य कोणताही निकष ते मानीत नसल्यामुळे समाजसुधारणांचे समर्थन करण्यासाठी स्मृतिवचनांचा आधार घेणे त्यांना मान्य नव्हते. पूर्वजन्म आणि पुनर्जन्म यांसारख्या कल्पनांवर त्यांचा विश्वास नव्हता आणि चातुर्वर्ण्य, जातिसंस्था, अस्पृश्यता, बालविवाह, ठरवून केलेले विवाह इ. गोष्टी त्यांना सर्वथैव अमान्य होत्या. मुला-मुलींना समान शिक्षण, कौशल्याधारित अभ्यासक्रम व व्यवसायाभिमुख शिक्षण द्यावे, दुष्ट आचारांचे निर्मूलन करावे, सदाचाराचा प्रसार करावा, ज्ञानवृद्धी करावी, सत्यसंशोधन करावी, भूतदया राखावी यासाठी ते प्रयत्नशील होते. मनुष्यजातीचे ऐहिक सुखवर्धन हेच त्यांचे ध्येय बनले होते.

यशोदाबाई फडके यांच्याशी विवाहबद्ध झालेल्या आगरकरांना दाम्पत्यजीवनात दु:ख, दारिद्र्य, संकटे आल्याने बौद्धिक वातावरण नसल्याची खंत होती. दम्याच्या विकाराने पुणे येथे १७ जून १८९५ रोजी त्यांचे देहावसन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**उरण : तालुक्यातील चिरनेर येथील २५ सप्टेंबर १९३० रोजी झालेल्या गौरवशाली व शौर्यशाली चिरनेर जंगल सत्याग्रह झालेल्या आक्कादेवी धरणावर तरुणांईची रोषणाई अवतरली असून रविवारच्या सुटीनिमित्त येथील आक्कादेवी धरणावर पर्यटकांनी मोठी गर्दी केली होती.** (छाया : जीवन केणी)

## आरोग्य प्रहर

# पावसाळ्यात सांधेदुखीच्या वेदना अन् सूज कमी करण्याचे उपाय



पावसाळ्यात सांधेदुखीची समस्या अनेकांना भेडसावते. यात सांध्यांमध्ये सूज, वेदना आणि ताठरपणा जाणवतो. पावसाळ्यात संधिवाताचा त्रास असलेल्या लोकांना या वेदना अधिक प्रमाणात जाणवत राहतात. या मागचे कारण म्हणजे वातावरणातील आर्द्रता. हाय ह्यूमिडिटी लेव्हल टिश्यूमुळे या वेदना अधिक वाढतात. अशावेळी पायांच्या बोटांपासून ते शरीरातील एक-एक अवयव ठणकतो. यामुळे जगणे असह्य वाटू लागते. पावसाळ्यात सांधेदुखीच्या त्रासापासून वाचण्यासाठी काही टिप्स सांगणार आहोत, ज्या फॉलो करून तुम्ही आराम मिळवू शकता.

पावसाळ्यात सांधेदुखी कमी करण्याचा सर्वांत सोपा आणि प्रभावी उपाय म्हणजे हायड्रेटेड राहणे. पावसाळ्यात अनेकदा कमी पाणी प्यायल्याने डिहायड्रेशन होऊ शकते आणि त्यामुळे सांध्याच्या समस्या वाढू शकतात. पाणी प्यायल्याने सांधे वंगण घालण्यास आणि ते निरोगी ठेवण्यास मदत होते. त्यामुळे वेदना कमी होतात.

फळे आणि भाजा असा संतुलित आहार सांधेदुखीवर नियंत्रण ठेवण्यासाठी महत्त्वाची भूमिका निभावतो तसेच मासे, अक्रोड आणि अळशी यांसारख्या ओमेगा-३ फॅटी ऍसिडने समृद्ध पदार्थांचा समावेश करा, कारण त्यात दाहक-विरोधी गुणधर्म आहेत जे सांधेदुखी कमी करण्यास मदत करतात.

पोहणे, सायकल चालवणे किंवा चालणे यासारखे कमी परिणाम करणारे व्यायाम सांध्यांभोवतीचे स्नायू मजबूत करतात. यामुळे सांध्यामधील लवचिकता सुधारते आणि वेदना कमी होण्यास मदत होते. अतिरिक्त वजनामुळे सांध्यांवर दबाव येऊ शकतो, ज्यामुळे सांधेदुखी वाढू शकते. सांध्यावरील ताण कमी करण्यासाठी वजन नियंत्रणात ठेवणे महत्वाचे आहे.

सांधेदुखी टाळण्यासाठी शरीराच्या हालचाली नीट ठेवणे आवश्यक आहे तसेच योग्य प्रकारचे शूज घालणे आवश्यक आहे. सांधेदुखीच्या वेदना लक्षात घेत गरम किंवा थंड पाण्याचा शेक घ्या. वेदना जळजळ झाल्यामुळे होत असेल तर थंड पाण्याने शेक दिल्यास लक्षणे कमी होण्यास मदत होऊ शकते. दुसरीकडे वेदना स्नायूंवरील तणावामुळे होत असल्यास गरम पाण्याने शेक दिल्यास स्नायूंना आराम मिळण्यास मदत होते.

# मुरूडमध्ये मुख्य रस्त्यावरील मोरी धोकादायक

## दुरुस्त करण्याची ग्रामस्थांकडून मागणी



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड-मुंबई या मुख्य रस्त्यावर नांदगाव हायस्कूल असून या शाळेला लागूनच सार्वजनिक बांधकाम खात्याने बांधलेली मोरी आहे. समुद्राचे पाणी वाहून जाण्यासाठी गोल पाईपलाईन टाकून ही मोरी बनवण्यात आली आहे. खूप वर्ष जुनी मोरी असल्याने या मोरीच्या भाग खाली वर झाला आहे. त्यामुळे या मोरीवरून गाडी गेल्यावर गाड्या उडतात व त्यातून अपघात होत आहेत.

मोरीला असणारे संरक्षक कठडे सध्याच्या घडीला तुटलेले असून त्यामुळे गाडीचा अपघात झाल्यास खोल खड्ड्यात पडून अपघातग्रस्त गंभीर जखमी होत आहेत. या मोरीचे काम पावसाळ्यापूर्वी होणे खूप गरजेचे होते, ही मोरी अगदी जवळच असणाऱ्या नांदगाव हायस्कूल शेजारी असल्याने येथून या हायस्कूलची शेकडो मुले नेहमीच ये-जा करीत असतात. संरक्षक कठडे व भिंत नसल्याने शालेय विद्यार्थी यांनासुद्धा धोका निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सन २०१९-२० मध्ये या रस्त्यावर मोरीच्या जागी छोटा पूल बांधण्यासाठी एक कोटी २५ लाख रुपये मंजूर झाले होते. ठेकासुद्धा ठेकेदाराने घेतला होता, परंतु हे काम घेतलेल्या ठेकेदाराने काम न केल्यामुळे हे काम रखडलेले आहे. या कामाचे लवकरात लवकर पुन्हा टेंडर काढून मंजूर निधी लवकरात लवकर खर्च करण्यात यावा, अशी मागणी येथील ग्रामस्थांनी केली आहे.

याबाबत नांदगाव ग्रामपंचायतीचे सदस्य सचिन पाटील यांनी सांगितले की, सद्यस्थितीत हायस्कूलजवळील मोरीचे सर्व लोखंडी पाईप तुटलेले आहेत. संरक्षक भिंतसुद्धा तुटलेली आहे. त्यामुळे गाडीचा अपघात झाल्यावर खोल अश्या चिखलात पडून गाडीचे व माणसांचे मोठे नुकसान होत आहे. यासाठी मुरूड सार्वजनिक बांधकाम खात्याने सर्वप्रथम लोखंडी पोल व संरक्षक भिंत बांधून लोकांना सुरक्षित करावे.

### पर्यटकांनाही करावा लागतोय अपघातांचा सामना

मुरूड तालुका हा पर्यटनाच्या दृष्टीने आवडीचा असल्याने येथे दर शनिवार-रविवार हजारो पर्यटक आपल्या वाहनाने मुरूडकडे येत असतात. पर्यटकांच्या जीविताचे रक्षण करण्यासाठी या मोरीचे काम लवकरात लवकर सुरू होणे खूप आवश्यक आहे. निधी मंजूर होऊनसुद्धा काम पूर्ण न करण्यात आल्याने आज पर्यटकांना अपघातास सामोरे जावे लागत आहे.

# कशेने गावच्या हद्दीत कार-दुचाकीचा अपघात

**माणगाव : प्रतिनिधी**

भरधाव वेगाने येणाऱ्या एर्टिगा गाडीची अँक्टिव्हा स्कुटीला धडक लागून झालेल्या अपघातात स्कुटी चालकासह दोघांना किरकोळ दुखापती होऊन दोन्ही वाहनांचे नुकसान झाले. हा अपघात बुधवारी (दि. १२) माणगाव तालुक्यातील कशेने गावचे हद्दीत घडला.

या अपघाताची फिर्याद हर्षद सखाराम पवार (वय २१) रा. पानसई करंजेवाडी (ता. माणगाव) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली. अपघाताबाबत माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, अपघातातील एर्टिगा गाडी क्र. जी. जे. १५ सी. जी. ३९७७ या गाडीवरील चालक याने त्याच्या ताब्यातील हि गाडी रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून भरधाव वेगाने चालवून फिर्यादी हर्षद सखाराम पवार यांची अँक्टिव्हा स्कूटी गाडी (एमएच. ०६ सीए ८१५९) या गाडीला धडक दिली.

या अपघातात फिर्यादी यांच्यासह दोघांना किरकोळ दुखापत होऊन दोन्ही वाहनांचे नुकसान झाले. या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात कॉ. गु. रजि. नं. २४२/२०२३ भादंवि कलम २७९,३३७, ३३८ मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे दाखल करण्यात आली आहे. अपघाताचा अधिक तपास सुरू आहे.

# ३६५ दिवस वृक्ष लागवडीचा उपक्रम

**मोहोपाडा, खालापूर : प्रतिनिधी**

वाढदिवसाला वृक्ष दान करा, आम्ही जोपासना करू या संकल्पनेतून दिलासा फाऊंडेशन खालापूरतर्फे ३६५ दिवस तीनशे पासष्ट वृक्ष मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.

सामाजिक कार्यकर्ते वैभव भोईर यांच्या वाढदिवसानिमित्ताने औषधी, बहुगुणी वृक्षाची लागवड खालापूर पोलीस ठाणे आवारात करण्यात आली. या वेळी खालापूर पोलीस ठाण्यातील कर्मचारी निलेश कांबळे, पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष अनंता ठोंबरे, वैभव भोईर, पत्रकार अरुण नलावडे, राकेश कदम, दीपक जगताप, उमेश पडवकर, राहूल देसाई, दीपक नाईकवडे, दिलासा फाऊंडेशन अध्यक्ष मनोज कळमकर, सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते. मुंबई पुणे द्रुतगती मार्गाला जोड रस्ता देतान खालापूर फाटा ते सावरोली जवळपास दीडशे महाकाय वृक्ष तोडण्यात आले कालापूरचे निसर्ग संपदा नष्ट झाली. वृक्ष वैभव नव्याने उभे राहावे यासाठी दिलासा फाउंडेशन वर्षाचे जेवढे दिवस आहेत तेवढे वृक्ष लागवड करणार असून त्याची जोपासनादेखील करणार आहे, असे खालापूरच्या दिलासा फाऊंडेशनचे अध्यक्ष मनोज कळमकर यांनी सांगितले.



# लोकलमधील मोबाईल चोरास रंगेहात पकडले

**कर्जत : प्रतिनिधी**

रात्री अडीचच्या सुमारास लोकलमधून प्रवास करणाऱ्या एका प्रवासी झोपेत असताना त्यांच्या खिशातून मोबाईल काढून पळून जाणाऱ्या चोरट्यास स्थानकावर असलेल्या कर्जत रेल्वे पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी रंगेहात पकडले.

राजेश श्रीनारायण मिश्रा हे रात्री अडीचच्या सुमारास लोकलने कर्जतहून शेलु येथे जात असताना भिवपुरी रोड स्टेशन येत असताना मिश्रा यांच्या झोपेचा फायदा घेऊन चोरट्याने त्यांच्या खिशातील १७ हजार रुपये किमतीचा रेडामो कंपनीचा मोबाईल काढून पळून जात होता. रेल्वे स्थानकावर बंदोबस्तासाठी असलेल्या कर्जत रेल्वे पोलीस ठाण्याच्या निकेश तुरडे या पोलिस कर्मचाऱ्यांने पळून जात असलेल्या चोरट्याला पकडून त्याच्याकडील मोबाईल हस्तगत केला.

या चोरट्याचे नाव लक्ष्मणकुमार चंदिखा यादव (वय ३८) असून तो उल्हासनगर येथे राहणारा आहे. या चोरट्याला न्यायालयात हजर केले असता त्याला न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

# इंदापूर नामदेव शिंपी समाज अध्यक्षपदी भाजपचे संजयआप्पा ढवळे बिनविरोध

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील इंदापूर गावच्या नामदेव शिंपी समाज अध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते तथा भाजपचे रायगड जिल्हा ओबीसी सेलचे अध्यक्ष संजयआप्पा द्वारकानाथ ढवळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून नामदेव शिंपी समाज तळाशेत- इंदापूर यांनी विशेष अभिनंदन करून संजयआप्पा ढवळे यांना शुभेच्छा दिल्या आहेत.



इंदापूर नामदेव शिंपी समाजाची बैठक मंगळवारी (दि. ११) इंदापूर येथे उत्साहात झाली. या बैठकीत समाजाची सन २०२३ ते २०२८ या कालावधीसाठी नूतन कार्यकारणी एकमताने निवडण्यात आली. त्यामध्ये समाजाच्या अध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते तथा भाजपचे रायगड जिल्हा ओबीसी सेलचे अध्यक्ष संजयआप्पा द्वारकानाथ ढवळे यांची एक मताने बिनविरोध निवड करण्यात येऊन उपाध्यक्षपदी मेघनाथ सातपुते, सचिव प्रमोद मिरजकर, खजिनदार संजय वंडकर, सदस्य सुधाकर क्षिरसागर, परमानंद कजबजे, वैभव पतंगे, देवेंद्र ढवळे, धनंजय ढवळे अशी कार्यकारणी एक मताने निवडण्यात आली.

नामदेव शिंपी समाज इंदापूर अध्यक्षपदी निवड झालेले संजयआप्पा ढवळे हे नामदेव शिंपी समाजाच्या उन्नतीसाठी चांगले काम करतील असा विश्वास त्यांच्यावर समाज बांधवांनी दाखवून त्यांची अध्यक्षपदी एक मताने बिनविरोध निवड करण्यात आली. संजयआप्पा ढवळे हे भाजपचे कार्यकर्ते असून सामाजिक कार्यात नेहमीच हिरीरीने सक्रिय सहभाग घेत असतात.

त्यांचे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, क्रीडा क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय आहे. आपल्या निवडीबद्दल प्रसार माध्यमांजवळ प्रतिक्रिया देताना संजयआप्पा ढवळे म्हणाले सर्वप्रथम मी सर्व समाज बांधवांचे माझी अध्यक्षपदी निवड केल्याबद्दल मनापासून ऋण व आभार व्यक्त करतो. नामदेव शिंपी समाजाच्या प्रगतीसाठी जास्तीत जास्त मेहनत घेऊन काम करणार असल्याचे ते म्हणाले.

# माणगावात खरिप हंगामातील लावणीची कामे सुरू

**माणगाव : प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसात संततधार पडणाऱ्या सरींमुळे तरवे तरारले असून माणगाव तालुक्यातील खरीप हंगामाची भातशेती लावणी सुरू झाली आहे. मान्सूनचा पाऊस उशिरा सुरू झाल्याने पेरणीची कामे उशीरा होऊन लावणीच्या कामांना उशीर झाला आहे. त्यामूळे शेतकरी मिळेल त्या साधनासह व मजुरकरांच्या मदतीने लागवडीच्या कामांना सुरूवात केली आहे.



तालुक्यात १२५८९ हेक्टर क्षेत्रावर भातशेतीची लागवड केली जाते. साधारणतः १२०० (एक हजार दोनशे) हेक्टर क्षेत्रावर भात पेरणी होऊन रोपे तयार झाली होती. यावर्षी मान्सून पूर्व झालेला पाऊस व गेल्या काही दिवसात संततधार पडणाऱ्या पावसामुळे खरीप हंगामातील भात पेरणी चांगली उगवली त्यामुळे शेतकरी लावणीच्या कामात व्यस्त झाले आहेत. पुढील काही दिवसात अशाच पद्धतीने पाऊस राहिल्यास जुलै महिन्या च्या अखेरीस लावणीची कामे पूर्ण होतील. गेले काही दिवस भातशेती साठी योग्य असे वातावरण राहिले असल्याने शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे. या वर्षी शेतीसाठी योग्य असा पाऊस होत असल्याने शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे.

**गेल्या काही दिवसात चांगला पाऊस होत असून भात शेतीचे तरवे तरारले आहेत. चांगला पाऊस राहिल्याने शेतीची लावणीची कामे सुरू झाली आहेत. असाच पाऊस व वातावरण राहिल्यास या जुलै महिन्यात लावणीची कामे पूर्ण होतील.**

**-सिताराम पोटले, शेतकरी, माणगाव**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed and registered contractors on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender Specification.

| Sr. No. | Tender No. EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated Cost | Submission Date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-17/23-24/ **RFx No. 7000027878** | Work of Retrofitting (Installation, Testing & Commissioning) of ZIV make Distance and Backup relay at 400 kV Nagothane s/s under 400 kV Nagothane div., under EHV O&M Circle, Panvel. **1st Extn...** | Rs. 8,20,100/- | 20.07.2023 up to 23:59 Hrs. |

**EMD 1% of Estimate Cost & Tender Fee:** Rs. 500/- + GST. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person:** Mitesh Goyal (DY. EE) Mob No. 9461456635
e-mail ID: **ee7230@mahatransco.in**
**Note:** All eligible Suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**400kV R.S. (O&M) Dn., Nagothane**

महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक कोकण विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, जून २९-जुलै ५,२०२३/आषाढ ८-१४, शके १९४५

## उप विभागीय अधिकारी, अलिबाग, उप विभाग अलिबाग, रायगड यांजकडून

### अधिसूचना

क्रमांक उविअ/एसआर ०२/ शहाबाज / अलिबाग / २०२३ म.औ.वि.म. – ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. तीन) यांच्या कलम एक, पोट-कलम (३) अन्वये काढण्यात आलेली व दिनांक १३ एप्रिल २०२३ च्या **महाराष्ट्र शासन राजपत्र,** भाग चार ब, पृष्ठ क्रमांक १ ते ३ वर प्रसिद्ध करण्यात आलेली दिनांक १३ एप्रिल २०२३ ची शासकीय अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. आयडीसी. २०१९ /(प्र.क्र. ४५५ ) / उ १४, उक्त अधिनियमाच्या प्रकरण सहाचे उपबंध हे त्या अधिसूचनेच्या अनुसूचित विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या क्षेत्रांत एप्रिल २०२३ महिन्याच्या १० व्या दिवसांपासून अंमलात येतील असा महाराष्ट्र शासनाने निर्देश दिला आहे ;

आणि ज्याअर्थी, यासोबतच्या अनुसूचित नमूद केलेल्या जमिनी उक्त प्रकरण सहाचे उपबंध उपरोक्तप्रमाणे अंमलात आले आहेत अशा क्षेत्रांत आहेत;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त अधिनियमाचे प्रकरण सहा हे ज्या क्षेत्रांना लागू करणेत आले आहे अशा क्षेत्रांत असणाऱ्या आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत (त्यात यानंतर ज्याचा उक्त महामंडळ असा निर्देश करण्यात आला आहे.) विकास करण्याच्या प्रयोजनार्थ किंवा उक्त अधिनियमाच्या उद्दिष्टांच्या पृष्टवर्थ असेल अशा इतर कोणत्याही प्रयोजनार्थ आवश्यक असणाऱ्या जमिनी संपादन करण्याची शक्ती उक्त अधिनियमांच्या कलम ३२ अन्वये राज्य शासनास प्रदान करण्यात आली आहे

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील अधिसूचना क्रमांक आयडीसी. १८९२ (१७४४१)/उद्योग-१४, दिनांक ११ जून १९९३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार व महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील शासन निर्णय क्रमांक आयडीसी. २०१९ (प्र.क्र. ४५५ ) / उद्योग-१४, दिनांक १७ एप्रिल २०२३ अन्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास नियम, १९६२ च्या नियम २८ नुसार सदर अधिनियमाच्या कलम ३२, कलम ३३, कलम ३६ व कलम ३८ चे अधिकार आणि कलम २ **(क) अन्वये उप विभागीय अधिकारी, अलिबाग, उप विभाग अलिबाग, जि. रायगड** यांना कार्यान्वित करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत आणि ज्याअर्थी, सोबतच्या परिशिष्टात नमूद केलेल्या क्षेत्राची महामंडळास घेरंड, शहापूर औद्योगिक क्षेत्राच्या पोहच रस्त्याकरिता जमिनी संपादन करणे आवश्यक आहे, असे उप विभागीय अधिकारी, अलिबाग, उप विभाग, अलिबाग यांना वाटते;

आणि ज्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाचे कलम ३२, पोट-कलम (२) अन्वये उपरोक्तप्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या राज्य शासनाच्या शक्तीचा वापर करून याद्वारे उप विभागीय अधिकारी, अलिबाग, उप विभाग, अलिबाग, जि. रायगड खाली नमूद केलेले जमिनीमध्ये हितसंबंध आणि अधिकार असणाऱ्या सर्व व्यक्तींना खाली उल्लेख केलेले जमिनीमध्ये उक्त प्रयोजनार्थ का संपादन करण्यात येऊ नयेत यासंबंधी ३० जून २०२३ पूर्वी खाली सही करणारास लेखी स्वरूपांत कारणे दाखविणेबद्दल फर्माविणारी नोटीस देत आहे.

या नोटिशीचे तारखेनंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या मंजुरीशिवाय विक्री करून, पट्ट्याने देऊन, गहाण ठेऊन, अभिहस्तांकन करून आणि अदलाबदल करून किंवा अन्य रितीने करावयाच्या उक्त जमिनीच्या / जमिनीच्या विल्हेवाटीसंबंधी केलेला कोणताही करार किंवा तीवर केलेला कोणताही खर्च किंवा ती मध्ये/त्यामध्ये केलेल्या सुधारणा वा उक्त जमिनीच्या अंतिमतः संपादन करण्यात येतील अशा भागासंबंधी भरपाई निर्धारित करणाऱ्या अधिकाऱ्यांकडून उक्त अधिनियमाचे कलम ३३, पोट-कलम (५) व भूमी संपादन अधिनियम, १८९४ (१८९४ चा एक) याच्या कलम २४ (सातव्यांदा) व भूमी संपादन, पुर्नवसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम ११ (४) अन्वये विचारात घेतल्या जाणार नाहीत.

ज्यांची व्यक्तिगत सुनावणी करण्याची इच्छा असेल अशा कोणत्याही व्यक्तीस या नोटीशीचे तारखेपासून एक महाचे आत भेटीची वेळ ठरवून कोणत्याही कामाच्या दिवशी सकाळी ११.०० ते ०१.०० वाजेपर्यंत खाली सही करणाऱ्याच्या कार्यालयात अलिबाग येथे समक्ष जातीने किंवा आपल्या कायदेशीर मुखत्यारामार्फत हजर रहाता येईल.

**अनुसूची**

**मोजे शहाबाज, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड**

| अ क्र. | सर्व्हे क्र./ गट क्र. | क्षेत्र (हे.आर) | अ क्र. | सर्व्हे क्र./ गट क्र. | क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ७५ पै | ०.९५६१ | १७ | ६०४ पै | ०.१६२७ |
| २ | ७४ पै | ०.१७७२ | १८ | ६०९ पै | ०.३२८३ |
| ३ | ७३ पै | ०. ५५८६ | १९ | ६१० पै | ०.०६७४ |
| ४ | ७२ पै | ०.२२१९ | २० | ६०७ पै | ०.२६३५ |
| ५ | ७१ पै | ०.०६२४ | २१ | ६२६ पै | ०.२२५१ |
| ६ | ५८७ पै | ०. ३१६६ | २२ | ६२८ पै | ०.३३४१ |
| ७ | ७० पै | ०.०३६८ | २३ | ६२९ पै | ०.२३२३ |
| ८ | ९४ पै | ०.३१६२ | २४ | ६२७ पै | ०.१८७५ |
| ९ | ९५ पै | ०.३२२६ | २५ | ६१९ पै | ०.५४५६ |
| १० | ५८९ पै | ०.३९३४ | २६ | ६२० पै | ०.२२९९ |
| ११ | १०१ पै | ०.५७५१ | २७ | ७६ पै | ०.१०२१ |
| १२ | १०० पै | ०.२२४० | २८ | ८७ पै | ०.०७६० |
| १३ | ५८६ पै | ०.३२९४ | २९ | ९३ पै | ०.०५६४ |
| १४ | ५८८ पै | ०.३३०८ | ३० | १०२ पै | ०.०४०९ |
| १५ | ५९१ पै | ०.०४९६ | ३१ | १०४ पै | ०.०३४६ |
| १६ | ६०८ पै | ०.१७८८ | ३२ | ६२२ पै | ०.०४४२ |
| | | | | **एकूण** | **७.९८०१** |

**अलिबाग,**
**दिनांक २६ जून २०२३.**

**सही/-**
**मुकेश चव्हाण,**
उप विभागीय अधिकारी, अलिबाग,
उप विभाग अलिबाग.

**क्र. जिमाका/राअ/जाहि/६७/२०२३ दिनांक. १३/०७/२०२३**

# नवी मुंबईतील उद्याने होणार सुशोभित

## महापालिकेचा ॲक्शन प्लॅन तयार



**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छ आणि सुंदर शहराप्रमाणेच ’उद्यानांचे शहर ही नवी मुंबईची एक वेगळी ओळख असून १०९ चौ. किमी महापालिका क्षेत्रात २२५ हून अधिक उद्याने व सुशोभित जागा नवी मुंबईत आहेत. नवी मुंबईतील अनेक उद्याने विशिष्ट संकल्पना घेऊन ‘थीम पार्क’ म्हणून महापालिकेने विकसित केली असून त्यामध्ये बेंचेस, कारंजे, खेळणी अशा आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. त्यामुळे केवळ नवी मुंबईकर नागरिकांचीच नाही तर नवी मुंबईला भेट देणाऱ्या इतर शहरातील नागरिकांचीही पसंती या उद्यानांना मिळत आहे.

विरंगुळ्याची आकर्षक ठिकाणे म्हणून प्रसिद्ध असलेल्या नवी मुंबईतील उद्यानांची वैशिष्ट्यपूर्णता टिकून रहावी याकरिता नमुंमपा आयुक्त राजेश नार्वेकर अत्यंत दक्ष आहेत. या उद्यानांची स्थिती उत्तम राहावी यादृष्टीने उद्यान विभाग आणि अभियांत्रिकी विभाग यांची संयुक्त बैठक घेत आयुक्तांनी दोन्ही विभागांनी परस्पर समन्वयाने उद्याने अधिक उत्तम होण्यासाठी सर्वतोपरी कार्यवाही करावी असे निर्देश दिले.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त संजय काकडे, शहर अभियंता संजय देसाई, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे, प्रशासन विभागाचे उपआयुक्त नितीन नार्वेकर, उद्यान विभागाचे उपायुक्त दिलीप नेरकर आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

पावसाळी कालावधीत उद्यानांची विशेष दक्षता घेण्याची गरज विशद करीत आयुक्त राजेश नार्वेकर यांनी देखभाल – दुरुस्तीची कार्यवाही अधिक काटेकोर करावी व संबंधित कंत्राटदारांना सतर्क राहण्याचे निर्देश द्यावेत अशा सूचना दिल्या. अशाच प्रकारे खेळणी दुरुस्तीसाठी प्रत्येक विभागाकरता वेगळे वार्षिक कंत्राट करून खेळणे नादुरुस्त झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर ते त्वरित दुरुस्त करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी असे निर्देश दिले. तसेच उद्यानांमधील ओपन जीमच्या दुरुस्तीबाबतही दक्षता घेण्याचे आयुक्तांनी सूचित केले. उद्यानांमधील टॉय ट्रेन कार्यान्वित करणेबाबतही आयुक्तांनी सूचना दिल्या.

मँगो गार्डन, रॉक गार्डन अशा काही उद्यानांमध्ये रेस्टॉरंट सुरू असून या रेस्टॉरंटची वेळ ही उद्यानांच्या वेळेइतकीच मर्यादित असावी अशा प्रकारच्या स्पष्ट सूचना आयुक्तांनी या वेळी दिल्या.

नवी मुंबई महापालिकेच्या उद्यानांमधील आवश्यक स्थापत्य, पाणीपुरवठा व विद्युत विषयक कामे विहित वेळेत तत्परतेने होण्याच्या दृष्टीने अभियांत्रिकी विभागाने अधिक बारकाईने लक्ष द्यावे व ही कामे जलद होण्याकरिता उद्यानांच्या देखभाल – दुरुस्ती कामांवर लक्ष ठेवण्यासाठी २ कनिष्ठ अभियंता स्वतंत्रपणे याच कामासाठी नेमावेत असेही आयुक्तांनी निर्देशित केले.

### नावलौकिक टिकविण्यासाठी प्रयत्न

प्रत्येक शहराची काही वैशिष्ट्ये असतात. त्या वैशिष्ट्यांमुळेच शहराच्या नावलौकिकात भर पडत असते. नवी मुंबईतील सर्वच उद्याने ही नागरिकांची आकर्षण केंद्रे असून हा नावलौकिक टिकवून ठेवण्यासाठी व तो वाढविण्यासाठी उद्यान विभागाने दक्षतेने कार्यरत राहणे गरजेचे आहे याची जाणीव करून देत त्यादृष्टीने सतर्क राहण्याचे निर्देश आयुक्त राजेश नार्वेकर यांनी उद्यान आणि अभियांत्रिकी विभागास दिले.

# घणसोलीत ४५० किलो प्लास्टिक साठा जप्त; १० हजार दंडवसूली



**नवी मुंबई : बातमीदार**

प्लास्टिकमुळे होणारी हानी लक्षात घेऊन नागरिकांनी प्लास्टिक पिशव्या व प्रतिबंधात्मक प्लास्टिकचा वापर टाळणेबाबत नवी मुंबई महापालिकेच्या वतीने नियमित जनजागृती करण्यात येत आहे. तसेच प्लास्टिक प्रतिबंधात्मक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कारवाईदेखील केली जात आहे. महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांचेमार्फत याबाबत नियमित बैठकीत आढावाही घेतला जात आहे.

या अनुषंगाने घणसोली विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी संजय तायडे यांच्या नियंत्रणाखाली तेथील स्वच्छता अधिकारी व स्वच्छता निरीक्षक आणि समुहाने धडक कारवाई करून सेक्टर ३ येथील पुजा एन्टरप्राईजेसच्या गोडाऊनवर धाड टाकत प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशव्या व प्रतिबंधात्मक प्लास्टिकचा साठा जप्त केला. यामध्ये ४५० किलोहून अधिक प्लास्टिक पिशव्या, प्लास्टिकच्या प्लेट, चमचे, कंटेनर असा प्लास्टिक साठा जप्त करीत १० हजार रक्कमेची दंडवसूलीही करण्यात आली.

महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांचे निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. बाबासाहेब राजळे यांच्या नियंत्रणाखाली ही कार्यवाही करण्यात आली. एकल वापराच्या प्लास्टिक वस्तूंचे उत्पादन, व्यापार, साठा, वितरण, विक्री आणि वापरावर बंदी घालण्याबाबत केंद्र सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने अधिसूचना जाहीर केली असून सुधारित घनकचरा व्यवस्थापन नियम – २०१६ अन्वये पॉलिस्टीन आणि विस्तारित पॉलिस्टिरीनसह सिंगल यूज प्लास्टिकलाही बंदी घालण्यात आली आहे. या नियमावलीचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास पहिल्या गुन्ह्याच्या वेळी पाच हजार रुपये, दुसऱ्यांदा गुन्हा घडल्यास १० हजार रुपये आणि तिसऱ्या गुन्हाच्या वेळी २५ हजार रुपये व तीन महिन्यांचा कारावास असे कारवाई करण्यात येत आहे.

सुजाण नवी मुंबईकर नागरिकांनी आपल्या भविष्याच्या व पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने प्लास्टिक पिशव्या आणि प्रतिबंधात्मक प्लास्टिकचा वापर पूर्णत: टाळावा नयेत, असे आवाहन करण्यात येत आहे.

# ’सीकेटी’मध्ये विद्यार्थ्यांचा गुण गौरव, छत्री वाटप

**पनवेल :** महापालिकेच्या माजी नगरसेविका तथा माजी सभापती सुशीला घरत यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवारी (दि. १५) अस्मिता कला, क्रिडा व सांस्कृतिक मित्र मंडळ व प्रियदर्शनी महिला मंडळ, नवीन पनवेलच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा गुण गौरव व ज्येष्ठ नागरीकांना छत्री वाटप करण्यात येणार आहे.

नवीन पनवेल सेक्टर १४ सीकेटी हायस्कूल येथे सायंकाळी ५ वाजता कार्यक्रम होणार असल्याचे निमंत्रक डॉ. अस्मिता जगदिश घरत यांनी सांगितले आहे. अधिक माहितीसाठी शिवनाथ पन्हाळे ९८१९९२५६५२, प्रशांत आवळे ९३२०८७१४६६, प्रफुल्ल पवार ९८१९९८२४३६, राजू बोराडे ९८२०६४६७६८ यांच्याशी अथवा नवीन पनवेल सेक्टर–१४ ई–१/०९/ सी–२ येथील जनसंपर्क कार्यालयाशी करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अवैद्य वाहतूक करणाऱ्यांकडून पावणे सात लाखांचा दंड वसूल

## चार महिन्यांतील आरटीओची कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

खासगी बसेसमधून होणाऱ्या अवैध वाहतुकीला आळा घालण्यासाठी नवी मुंबई आरटीओकडून अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई सुरू आहे. एप्रिल ते जुलै या महिन्यात तब्बल ३१७ अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यात आली असून सहा लाख ७३ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला.

आजही शहरातील महामार्गवर काही वाहने विना परवाना, फिटनेस, इन्शुरन्स व पीयूसी नसताना नियमबाह्यपणे चालविली जात आहेत. अनेकदा खासगी बसमधून प्रवासी वाहतुकीबरोबर व्यासायिक मालवाहतुक ही केली जाते. खासगी बसेस या प्रवासी वाहतुकीसाठी असून मालवाहतुकीसाठी त्याचा वापर करणे नियमात नसताना ही अनधिकृत रित्या मालवाहतूक केली जाते.त्याच प्रमाणे यंदा अवैध शालेय बस वाहतुकीचे प्रमाण कमी असले तरी मागील वर्षी अवैध, नियमबाह्य पद्धतीने विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या शालेय बसचे प्रमाण अधिक होते. यातील बहुतांश बसेस नियमांना बगल देत विनापरवाना कागद पत्रांच्या पूर्तता अभावी चालत असल्याचे आरटीओ ने केलेल्या कारवाईत स्पष्ट झाले होते. नियमानुसार विद्यार्थ्यांची वाहतूक करण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून (आरटीओ) योग्यता प्रमाणपत्र घेणे आवश्यक असते. त्यामुळे यंदा शाळा प्रशासनाने वाहतूकदारांकडे योग्यता प्रमाणपत्र आहे की, नाही याची शहानिशा करूनच विद्यार्थी वाहतूक परवानगी दिली आहे.

या वेळी आतापर्यंत २० अवैध शालेय वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. त्यांच्याकडून १ लाख ५२ हजार दंड वसूल करण्यात आला. शहरात आजमितीस १२०० शालेय बस नोंदीत आहेत. जादा प्रवासी वाहतूक करणे इत्यादी अवैध पध्दतीने वाहतूक केली जात आहे. अशा बसवर आरटीओ कडून एप्रिल आणि जुलै या चार महिन्यांत ३१७ बसवर कारवाई करण्यात आली आहे. त्यांच्याकडून ६ लाख ७३ हजार रुपये दंड वसूल करण्यात आली आहे, अशी माहिती आरटीओ उपप्रादेशिक अधिकारी हेमांगिनी पाटील यांनी दिली आहे.

दरम्यान, अवैध वाहतूकीचे प्रमाण वाढले असल्याने या वाहतूकीला आळा घाण्याचे पोलिसांसमोर आव्हान आहे.

# नवी मुंबई पालिकेतील वरिष्ठ लिपिक, कर निरीक्षकांच्या बदल्यांवर आक्षेप

## भाजपचे सुधीर पाटील यांची आयुक्तांकडे तक्रार

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई पालिकेच्या विविध विभागांतील ३०९ अधिकारी, कर्मचारी यांच्या व्यापक स्वरूपातील बदल्यांचा व पदस्थापनेचा निर्णय महानगरपालिकेच्या कामकाजाला गतिमानता देण्यासाठी आयुक्तांनी घेतला आहे. त्यात २५ वरिष्ठ लिपिक व कर निरीक्षकांच्या संवर्गातील देखील बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यावर भाजपाचे सुधीर पाटील यांनी आयुक्तांकडे तक्रार केली आहे.

एकूण १५० अधिकारी, कर्मचारी यांची पदोन्नतीनंतर पदस्थापना करण्यात आली. कार्यप्रणालीमध्ये सुसूत्रता येण्याच्या दृष्टीने अनेक वर्षे एका विभागात कार्यरत असलेल्या १५९ अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. अशाप्रकारे तब्बल ३०९ अधिकारी, कर्मचारी यांच्या व्यापक स्वरूपातील बदलीचा व पदस्थापनेचा हा महत्त्वपूर्ण निर्णय महापालिकेच्या कामकाजाला गतिमानता देण्यासाठी आयुक्तांनी घेतला आहे. त्यात २५ वरिष्ठ करण्यात आल्या आहेत. त्यावर आक्षेप घेत आयुक्तांकडे याप्रकरणी तक्रार केली आहे.

अखिल भारतीय सेवेतील अधिकारी आणि अ, ब, क गटातील राज्य शासनाच्या सर्व सेवकांकरिता एखाद्या पदावर असण्याचा सामान्य एक ते दीड वर्षांपूर्वीदेखील काही बदल्या होणे अपेक्षित असताना आयुक्तांकडे या प्रकरणाची संवर्गातील देखील बदल्या कालावधी तीन वर्षांचा असतो. विभागातील ६० ते ७० टक्के काही अधिकारी, कर्मचाऱ्यांची त्यानुसार संदर्भित आदेशान्वये ७ जुलै रोजी काही ठरावीक वरिष्ठ लिपिक/कर निरीक्षक यांच्या प्रशासन विभागामार्फत आयुक्तांच्या आले आहेत.

जे कर्मचारी तीन वर्षांपेक्षा जास्त कालावधीत या विभागात कार्यरत होते, त्यांच्या बदल्या करण्यात आल्या नव्हत्या. अशा प्रकारे मागील कालखंडात बदली न झालेल्या तथा या विभागात तीन वर्षांपेक्षा जास्त कार्यकाळ झालेल्या कर्मचाऱ्यांची संख्या छोटी असल्यामुळे आताच्या उर्वरित कर्मचाऱ्यांची नावे असणे अपेक्षित आहेत, तसेच सरसकट अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या बदल्या निवड करून बदली करण्यात प्रशासन विभागाकडून करण्यात आल्याचे प्रदेश उपाध्यक्ष कोकण विभाग, राज्य कामगार मोर्चा, भाजपचे सुधीर पाटील यांनी तक्रारीत म्हंटले आहे.

# लोकसंख्या दिनी टीबी रुग्णांना पोषण आहारासह धान्यवाटप



**उरण : बातमीदार**

जागतिक लोकसंख्या दिनाचे औचित्य साधून प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियानांतर्गत निश्चय मित्र योजनेंतर्गत, इंडियन ऑइल अदानी वेंचर लिमिटेड कंपनी उरण यांनी तालुक्यातील कोप्रोली व गव्हाण प्रा. केंद्र अंतर्गत असणारे क्रियाशील टीबी रुग्णांना त्यांच्या सीआरएस फंडातून कंपनीने १२५ रुग्णांना सहा महिन्याकरता दत्तक घेऊन पोषण आहार व प्रोटीन युक्त धान्यचे वाटप करण्यात आले.

या वेळी आयओटीएल कंपनीचे एस आर गणेशन, डायरेक्टर फायनान्स अतुल खराटे, भूपेश शर्मा, मिलिंद मोघे, संदीप काळे, नाजनीन शेख, प्रफुल्ल म्हात्रे, शिवानी राठोड तसेच या कार्यक्रमासाठी जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. वंदन कुमार पाटील, उरण पंचायत समिती गटविकास अधिकारी समीर आठावकर,

उरण तालुका आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र इटकरे, कोप्रोली वैद्यकीय अधिकारी डॉ. राज चव्हाण, प्राथमिक आरोग्य केंद्र गव्हाणच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. अस्मिता बोंबटकर, नागरी आरोग्य केंद्र उरणच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. काजल लकडे, तालुक्यातील सर्व वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असणारे कर्मचारी आशा गटप्रवर्तक व ज्यांच्यासाठी हा कार्यक्रम आयोजित केला होता असे क्षय रुग्ण मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उरण तालुका आरोग्य सहाय्यक संतोष परदेशी यांनी केले.

# सानपाड्यातील बंद पथदिव्यांची तत्काळ दुरूस्ती करा -आमले

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा सेक्टर २मधील नादुरूस्त व बंद अवस्थेत असलेल्या पथदिव्यांची तात्काळ दुरूस्ती करण्याचे संबंधितांना निर्देश देण्याची मागणी भारतीय जनता युवा मोर्चा, नवी मुंबई जिल्हा उपाध्यक्ष आणि अखिल भारतीय माथाडी संघटना नवी मुंबई जिल्हाध्यक्ष पांडुरंग आमले यांनी एका निवेदनातून महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्याकडे केली आहे.

सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू आहेत. पावसाळा सुरु होण्यापूर्वीच पथदिवे, रस्त्यावरील खड्डे, पदपथ व अन्य कामांबाबत आपण सानपाडा–जुईनगर नोडमध्ये पाहणी अभियान राबवून कामांची पाहणी करावी यासाठी आम्ही आपणाकडे यापूर्वीच पाहणी अभियान करण्याची लेखी मागणी केली होती. आपल्या कार्यालयाकडून केवळ निवेदन फॉरवर्ड करण्यात आले, परंतु कार्यवाही झालीच नाही. आज सांयकाळनंतर सानपाडा सेक्टर २ परिसरात काळाकुट्ट अंधार पसरलेला दिसून येत आहे. पथदिवे सर्वच बंद असल्याने अंधाराचा गैरफायदा घेत समाजातील विकृतांकडून महिलांची तसेच मुलींची छेडछाड अथवा अन्य गैरप्रकारही होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. पावसामध्ये काही घटना घडल्यास कोणाला आवाजही जाणे शक्य नाही.

अंधारात ज्येष्ठ नागरिकांना, लहान मुलांना ये–जा करण्यास त्रास होत आहे. समस्येचे गांभीर्य पाहता सानपाडा सेक्टर २ परिसरातील प्रियंका सोसायटीपासून ते निळकंठ टॉवरपर्यत बंद असलेल्या पथदिव्यांची तात्काळ दुरूस्ती करून स्थानिक रहीवाशांना दिलासा देण्याची मागणी पांडुरंग आमले यांनी केली आहे.

दरम्यान, पांडुरंग आमले नेहमीच जनतेच्या समस्या सोडविण्याला प्राधान्य देतात.

# चिरले गावात उमटल्या काव्य लहरी



**उरण : वार्ताहर**

काव्य दरबार उरण तर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही रविवारी वर्षा सहलीचे आयोजन करण्यात आले होते. चिरले गावातील निसर्गरम्य धबधब्यावर जाऊन, कवींनी धबधब्यातून खाली पडणाऱ्या नैसर्गिक पाण्याचे नयनरम्य दृश्य डोळ्यात साठवून ठेवले. त्यानंतर इतिहास संशोधक के. एम. मढवी यांच्या चिरले येथील निवासस्थानी कवी संमेलनाचा कार्यक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कादंबरीकार गजानन म्हात्रे यांनी भूषविले होते. प्रारंभी कवी अरुण द. म्हात्रे यांनी ईशस्तवन तसेच बासरी वादन व डफली वादन करून कवींना मंत्रमुग्ध केले. कवी हरिश्चंद्र माळी यांनी टाळ वाजवून कार्यक्रमात रंगत आणली. ज्येष्ठ कवी के. एम. मढवी यांची पाऊस पाऊस चिखल चिखल ही कविता शेतकऱ्यांच्या जीवनाचे सार सांगून गेली. काव्य दरबारचे अध्यक्ष प्रकाश ठाकूर यांनी प्रास्ताविकेतून संपूर्ण कार्यक्रमाचा आढावा घेतला. ज्येष्ठ कवी के.एम.मढवी,श्री.बागडे, जयराम कराले, अश्विनी माळी , मीनल माळी, हरिश्चंद्र माळी, गजानन म्हात्रे, अरुण म्हात्रे या कवींनी सादर केलेल्या कवितांनी, कवींना पावसात भिजण्याचा आनंद दिला. वाद्याची साथ असल्यामुळे कार्यक्रमाची रंगत वाढली होती.

काव्य दरबार या वाङमय मंडळाच्या ठरावानुसार दर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात कवी संमेलन घेतले जाते. भैरवी घेऊन, कार्याध्यक्षा मीनल माळी यांनी आभार व्यक्त केले. शेवटी उपस्थित सर्व कवींनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला. त्यानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# नेरूळ विभागात वीज समस्येने नागरिक हैराण

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ विभागातील शिवाजीनगर झोपडपट्टी भागात वीज गायब होण्याचे प्रकार वारंवार घडत असून त्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत.

शिवाजीनगर येथे मंगळवारी (दि. ११) रात्री ८ वाजल्यापासून रात्री १२ वाजेपर्यंत वीज गायब झाली असल्याने नागरिकांचे हाल झाले विशेषत वृद्ध आणि लहान मुलाचे हैराण झाले. या ठिकाणी वीज गायब होण्याचे प्रकार घडत असून पावसाळ्यापूर्वी महावितरण विभागाने तांत्रिक दुरुस्त्या का केल्या नाहीत, असा सवाल भाजप ओबीसी सेल नवी मुंबई अध्यक्ष राजेश पाटील यांनी केला आहे.

# उरणमध्ये रक्तदान शिबिराला उत्तम प्रतिसाद

**उरण : बातमीदार**

उरणमधील प्रसिद्ध निवेदक आणि सामाजिक कार्यकर्ते सुनील वर्तक यांचे वडील स्वर्गीय गोपाळ आलोजी वर्तक ऊर्फ आप्पा यांच्या स्मृती दिनानिमित्त गोवठणे विकास मंच आणि समर्पण ब्लड सेंटर यांच्या सौजन्याने भव्य रक्तदान शिबिर रविवारी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले होते.

या रक्तदान शिबिराच्या उद्घाटनावेळी सामाजिक कार्यकर्ते सूर्यकांत पारधे, नरेश शेंडे, संतोष थळे मुंबई,माजी उपसरपंच विक्रांत वर्तक, समीर म्हात्रे, साईकृपा इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचे राकेश पाटील, श्री. छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुदेश म्हात्रे, कार्याध्यक्ष विठ्ठल ममताबादे, पत्रकार नंदकुमार तांडेल, सीएचए संघटनेचे अध्यक्ष रूपेश भगत, सुषमा म्हात्रे, निगा फाउंडेशनचे निलेश गावंड, प्रा. शिक्षक अजित जोशी यांसह रक्तदान चळवळीत सक्रीय संस्थांचे अध्यक्ष, पदाधिकारी व उरण तालुक्यातील विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

भव्य रक्तदान शिबिर स्वर्गीय गोपाळ आलोजी वर्तक सभामंडप गोवठणे येथे मोठ्या उत्साहात झाले. एकूण ५७ रक्तदान झाले. या कार्यक्रमात नितेश पंडित, जीवन डाकी, राजेंद्र भगत, हेमाली म्हात्रे, चेतन पाटील आदींनी निवेदन केले.



## निवडक

### डोणवत धरण परिसरात वृक्षलागवड



**चौक** : प्राथमिक शाळा, माध्यमिक विद्यालय, कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी, पालक, शिक्षक व वन विभाग खालापूर यांच्या सहकार्याने गोदरेज कंपनीने हजारो औषधी वनस्पती झाडांची लागवड वनक्षेत्रपाल कुलदीप पाटकर व कंपनी व्यवस्थापन यांच्या हस्ते डोणवत धरणाच्या परिसरात केली. या वेळी गोदरेज कंपनीचे अधिकारी तानाजी चव्हाण, वन क्षेत्रपाल कुलदीप पाटकर, हॉर्टिकल्चर डिपार्टमेंट प्रमुख आरती भांबोरे, रमेश भंडारकर, सर्जेराव थोरात, कर्मचारी सहभागी झाले होते.

### हिरवळ महाविद्यालयात स्वागत सोहळा



**माणगाव** : हिरवळ एज्युकेशन ट्रस्टच्या कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, महाड येथे प्रथम वर्षाच्या प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी मंगळवारी (दि. ११) स्वागत सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून ट्रस्टच्या प्रमुख सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी, प्राचार्य सुदेश कदम, राकेश वडवळकर उपस्थित होते. या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या विविध विभागांच्या कामकाज बद्दल माहिती देण्यात आली. प्राचार्य सुदेश कदम यांनी विद्यार्थ्यांना हिरवळ संस्थेविषयी माहिती देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले. संस्थेच्या प्रमुख सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी यांनी सर्व विद्यार्थ्यांना विविध उपक्रमांमध्ये सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहन दिले. हिरवळ संस्थेचे अध्यक्ष किशोर भाई धारिया, संचालिका सोनाली धारिया यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### भिलवले धरणातील पाण्याचा विसर्ग



**खोपोली** : उशिरा का होईना पावसाचे आगमन झाले असून आता समाधानकारक पाऊस पडत आहे. खालापूर तालुक्यातील सिंचनासाठी असलेले भिलवले धरण पूर्ण क्षमतेने भरले असून सांडव्यातून पाण्याचा विसर्ग सुरू झाला आहे. शनिवार व रविवारी मुंबई व पुण्याकडे पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे.

### ओंकार विद्यामंदिराला स्वाध्याय पुस्तिका



**मुरुड** : येथील हिंदू एज्युकेशन सोसायटी संचलित ओंकार विद्यामंदिरमध्ये इ. पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना स्वाध्याय पुस्तिकांचे मोफत वाटप संस्थेचे चेअरमन दिलीप जोशी यांच्या उपस्थितीत करण्यात आले. पुणे येथील अर्चना जोशी व दर्शना कुलकर्णी यांच्या माध्यमातून स्वाध्याय पुस्तिका दिल्याची माहिती ओंकार विद्यामंदिराच्या अध्यक्ष दीपाली जोशी यांनी शिक्षक-पालक सभेत दिली. गतवर्षी दिलेल्या स्वाध्यायिका ज्या विद्यार्थ्यांनी व्यवस्थित सोडविल्या त्यांना बक्षीस म्हणून टिफीन बॉक्सही वितरित करण्यात आले. या वेळी मुख्याध्यापिका प्रविता गार्डी, उपमुख्याध्यापिका अश्विनी पाटील, व्यवस्थापन समिती सदस्य उषा खोत, मनिषा फाटक, सुनील विरकुड आदी उपस्थित होते.

### चौक परिसरातील होनाड येथे वृक्षारोपण

**चौक** : लायन्स क्लब ऑफ खोपोली आणि मेसर्स गार्गी कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने होनाड येथे वृक्षारोपण करण्यात आले. या वर्षी ३०० झाडांचे वृक्षारोपण व संवर्धन करण्याचे योजिले आहे. मागील वर्षीदेखील लायन्स क्लब ऑफ खोपोली आणि मेसर्स गार्गी कंपनी यांनी ५९० झाडे लावली होती. त्यातील ७० टक्के झाडांचे संवर्धन करण्यास यश आले. आडोशी हा परिसर इंडस्ट्रिअल परिसर असल्याने तेथे पर्यावरणाची हानी कमी करण्यासाठी वृक्ष लागवडीची आत्यंतिक गरज लक्षात घेऊनच येथे वृक्षारोपण उपक्रम राबविण्यात आला. यासाठी उपक्रम प्रमुख राज गावडे, लायन्स क्लबचे अध्यक्ष लायन अतीक खोत आणि कंपनीचे कर्मचारी उपस्थित होते.




# वरंध घाटातील अवजड वाहतूक बंद

## वारंवार दरडी कोसळण्याच्या घटनांमुळे निर्णय

**महाड : रामप्रहर वृत्त**

पावसाळ्यात महाड तालुक्यातील वरंध घाटामध्ये अनेक वेळा दरडी कोसळण्याच्या घटना घडत आहेत. त्यामुळे अवघड वळणमार्गावर काम करण्यासाठी वरंध घाट काही कालावधीसाठी बंद करणे आवश्यक आहे. त्यानुसार या महामार्गावरील सर्व प्रकारची अवजड वाहतूक ३० सप्टेंबरपर्यंत बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



त्याचप्रमाणे आयएमडीच्या अतिवृष्टीच्या इशारा कालावधीतदेखील सर्व प्रकारच्या वाहनांसाठी महामार्ग वाहतुकीसाठी बंद करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. या बंद कालावधीमध्ये पर्यायी मार्ग म्हणून पुण्याकडे जाण्यासाठी महाड-माणगाव-निजामपूर-ताम्हाणी घाट-मुळशी-पिरंगुट पुणे तसेच कोल्हापूरकडे जाण्यासाठी राजेवाडी फाटा-पोलादपूर-खेड-चिपळूण-पाटण कराड-कोल्हापूर असा पर्याय सूचविण्यात आला आहे.

या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी ७ जुलैपासून ते ३० सप्टेंबरपर्यंत वरंध घाटातील रस्ता अवजड वाहतुकीकरिता व आयएमडीच्या अतिवृष्टीच्या इशाऱ्याच्या वेळी सर्व प्रकारच्या वाहतुकीकरिता बंद ठेवण्याबाबत आदेश जारी केले आहेत.

# मुंगुर मत्स्यपालन प्रकरणी सहा जणांविरोधात गुन्हा दाखल

**खालापूर : प्रतिनिधी**

तालुक्यात बेकायदा सुरू असलेल्या मुंगुर मत्स्यपालनाविरोधात मत्स्य विभाग रायगड यांनी धडक तपासणी मोहिमेनंतर सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




याप्रकरणी भाई काशिनाथ पाटील (रा. पेंधर पनवेल), प्रसाद पाटील (रा. महड, खालापूर), मेहदूल इस्लाम काझी (हाळ खुर्द २), नसरुद्दीन अब्दुल सत्तार बेडेकर (रा. हाळ खुर्द खालापूर ), मुक्कम्मिल विश्वास (रा. महड खालापूर), नसरुद्दीन मुल्ला (रा. पनवेल) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आले आहे.

खालापूर तालुक्यातील धामणी परिसरातील तलावावर सोमवारी सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय रायगड विभाग संजय पाटील, सहाय्यक मत्स्य व्यवसाय अधिकारी चेतन निवलकर, सोनल तोडणकर, खोपोली सहाय्यक मत्स्य व्यवसाय अधिकारी अजय भाटकर यांच्यासह पाटबंधारे विभाग, प्रदूषण नियमक मंडळ, पोलीस, तहसील विभागाने कारवाई केली होती.

# जांबरुंग येथे परसबाग बियाणे वाटप

**खोपोली : प्रतिनिधी**

जांबरुंग येथे महिलांना परसबाग बियाणे वाटप करण्यात आले. परसबाग बियाणे लागवडीपासून ते फळधारणेपासून सखोल माहिती देण्यात आली. शिवाय ताजी भाजी उपलब्ध होत असल्यामुळे बाजारपेठेतून भाजी विकत घ्यावी लागणार नाही. यामुळे साहजिकच अर्थिकची बचत होत असते. पावसाचे चार महिने पाऊस असल्यामुळे आपण रोपांना पाणी घालण्यांचे आवश्यकता भासत नाही, मात्र थोडीशी मेहनत घेतल्यास आपल्या कुटुंबासाठी ताजी भाजी उपलब्ध होत असते. हा कार्यक्रम शासन कृषी विभाग, तालुका कृषी अधिकारी खालापूर कार्यालयाच्या माध्यमातून करण्यात आले.

या वेळी उपविभागीय कृषी अधिकारी खोपोली फुलसुंदर तालुका कृषी अधिकारी निंबाळकर, कृषि परिवेक्षक खालापूर नितिन महाडीक यांच्या मार्गदर्शनाखाली माझ्या चांगल्या आरोग्यासाठी माझी परसबाग याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. ग्रामीण रोजगार हमी योजना, महाडीबीटी यांत्रिकीकरण योजना, पीएमएफएमई, खरीप हंगाम भातपीक विमा योजना याविषयी कृषी मंजुषा शिंदे यांनी महिलांना मार्गदर्शन केले.

उपस्थित महिलांना भाजीपाला मिनी कीट बियाणे मोफत वाटप करण्यात आले.



# कशेळे-खांडस पुलावरील रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील किकवी चिल्हार नदीवरील पुलाची अवस्था दयनीय झाली आहे. पुलावरील रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून पुलावरील सळ्या दिसू लागल्या आहेत. पुलाचे संरक्षक कठडे तुटल्याने प्रवाशांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.

कशेळेपासून खांडस भागात जाणाऱ्या रस्त्यावर २५हून अधिक गावे आणि आदिवासीवाड्यांचा वाहतुकीचा मार्ग कशेळे-खांडस- किकवी येथील पूल आहे. कशेळेपासून खांडस, नांदगाव गावाकडे जाणाऱ्या १२ किमीच्या रस्त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाने मागील पाच-सहा वर्षांत किमान १५ कोटी रुपयांचा निधी खर्च केला आहे. काही ठिकाणी रस्त्यावर कारपेट टाकले नाही.



पुलाकडे ठेकेदाराने दुर्लक्षित केले आहे. त्यामुळे एखादा अपघात होण्याआधी या रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी प्रवाशांमधून जोर धरीत आहे.

> **खांडस रस्त्यावर पावसाने खड्डे पडले आहेत. कशेळे-खांडस नांदगाव रस्त्यावर तसेच पुलावर मागील दहा वर्षात किती आणि कोणती कामे झाली याची शासनाने चौकशी करावी.**
>
> **-भरत शिद,**
> **आदिवासी कार्यकर्ता**

# महिलांच्या सुरक्षेसंदर्भात रेल्वे पोलिसांची जनजागृती

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत रेल्वेस्टेशनवरील फलाट क्र. १ ते ३ वरील महिलांच्या राखीव डब्याच्या ठिकाणी महिला सुरक्षेच्या अनुषंगाने पोलीस अंमलदार, होमगार्ड यांचेमार्फत महिला सुरक्षेसंदर्भात बुधवारी (दि. १२) जनजागृती करण्यात आली.

कर्जत रेल्वे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संभाजी जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली महिला सुरक्षा संदर्भात जनजागृती करताना, संभाजी यादव यांनी महिलांच्या सुरक्षेकरीता रात्रीच्या व पहाटेच्या वेळी महिलांकरीता राखीव डब्यांमध्ये रेल्वे पोलिसांकडून सुरक्षा कर्मचारी नेमण्यात आले आहेत.



महिला प्रवाशांनी महिलांकरीता राखीव असलेल्या डब्यातून प्रवास करावा, महिलांनी एकटे राखीव डब्यातून प्रवास करतांना सुरक्षा कर्मचारी डब्यामध्ये आहे याची खात्री करावी, सुरक्षा कर्मचारी नसल्यास, प्रवाशी असलेल्या डब्यातून प्रवास करावा. रेल्वेस्टेशन अथवा रेल्वे प्रवासात कोणत्याही प्रकारची छेडछाडीची घटना होत असल्यास त्याची माहिती तत्काळ कर्तव्यावरील पोलीस अंमलदार अथवा रेल्वे पोलीस हेल्पलाईन क्र. १५१२वर कळवावी. लोकल गाडयांमध्ये चढतांना अथवा उतरतांना व प्रवासादरम्यान आपला मोबाईल, बॅग व इतर मौल्यवान वस्तूंवर लक्ष द्यावे. लोकलमध्ये चढतांना अथवा उतरतांना आपल्याजवळील बॅग पाठीवर न लावता समोर धरावी जेणेकरून चोरांना चोरी करण्याची संधी मिळणार नाही, अशा महत्त्वपूर्ण सूचना केल्या.

या वेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिर्वाद शिंदे, ज्ञानेश्वर पाटील, सुनील ठाकूर, निकेश तुरडे, किरण देवकर, नितिन मोहिते, अक्षय पेडणेकर, राज बागुल आदी उपस्थित होते.

# माणगावातील नेत्र शिबिरात ६८ रुग्णांची तपासणी



### १८ रुग्णांवर त्वरीत शस्त्रक्रिया

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व विजयशेठ चॅरिटेबल ट्रस्टतर्फे बुधवारी (दि. १२) नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात शंकरा आय हॉस्पिटलचे नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी ६८ रुग्णांची तपासणी करून १८ नेत्ररुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.

शिबिरासाठी महेंद्र मेथा यांनी विनामूल्य जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे मेथा परिवारातर्फे विजयशेठ मेथा, मनीष मेथा, विधिता मेथा यांनी विशेष आभार व्यक्त केले. शिबिरासाठी विजय मेथा, तनुजा हेमंत मेथा, छाया मेथा, विधिता मेथा, मनीष मेथा, सुप्रिया शिंदे यांच्यासह शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेलचे टीम व्यवस्थापक प्रकाश पाटील, अपर्णा हरिंद्रनाथ, अक्षता पार्टे, अवंतिका गलांडे यांनी सहकार्य केले.

# पुस्तके संस्कृतीचे मस्तक असतात

## डॉ. दिलीप पांढरपट्टे यांचे पुस्तक प्रकाशनावेळी प्रतिपादन

**अलिबाग : प्रतिनिधी**

पुस्तके असली तर संस्कृती टिकते. पुस्तक हे संस्कृतीचे मस्तक आहे. हे मस्तक उन्नत करण्याचे कार्य लेखक करतात. त्यामुळे पुस्तक निर्मिती करणाऱ्यांना समाजाने नेहमी मदत केली पाहिजे, असे प्रतिपादन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सदस्य, गझलकार डॉ. दिलीप पांढरपट्टे यांनी केले.

प्रतिक प्रकाशन, पुणे प्रकाशित शरद कोरडे यांच्या 'गुजरा हुआ जमाना' या पुस्तकाचे प्रकाशन सोमवारी (दि. १०) रायगडचे माहिती अधिकारी मनोज सानप यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून दिलीप पांढपट्टे बोलत होते. श्रीबाग येथे झालेल्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार, उद्योजक गजेंद्र दळी, द्वारकानाथ नाईक, सखाराम पवार, साहित्यिक-पत्रकार उमाजी केळुसकर आदी उपस्थित होते. जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांनी, या वेळी बोलताना, शरद कोरडे यांनी गुजरा हुआ जमाना हे पुस्तक लिहून जुन्या काळातील कलाकारांची नव्याने ओळख करुन दिली असल्याचे सांगितले. अजित पवार, उमाजी केळुसकर, द्वारकानाथ नाईक यांनीही शरद कोरडे यांच्या कार्याचा गौरव केला.

पुस्तकाचे लेखक शरद कोरडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. भारती तरे, नागेश कुळकर्णी, प्रकाश म्हात्रे, श्रीरंग घरत, दिलीप शिंदे, आर. के. घरत, सुभाष क्षिरे, पुरुषोत्तम साठे, अनंत देवघरकर, मेघना कुलकर्णी, मानसी चेऊलकर, यशवंत थळे, दिलीप देवळेकर आदी या वेळी उपस्थित होते. सूत्रसंचालन ॲड. के. डी. पाटील यांनी केले.



# मोरे महिला महाविद्यालयात युवती स्वसंरक्षण प्रशिक्षण



**रोहे : प्रतिनिधी**

राजमाता जिजाऊ युवती स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत एम. बी. मोरे महिला महाविद्यालय धाटाव येथे युवती स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन बुधवारी (दि. १२) करण्यात आले.

या वेळी एम. बी. मोरे फाऊंडेशन अध्यक्ष विजयराव मोरे, मोरे महाविद्यालय प्राचार्य प्रसन्न म्हसळकर, पं. स. बालविकास प्रकल्प अधिकारी ज्योती घाडगे, पोलीस श्रीधर अधिकारी, कुणाल आंबले, भारतीय विद्यार्थी परिषद प्रमुख वक्त्या अरुंधती पेंडसे, कराटे प्रशिक्षक विनायक सकपाळ आदी उपस्थित होते.

विद्यार्थिनींना सायबर गुन्हे, मुली आणि पालकांचा संवाद, समाजातील महिला अत्याचार आणि त्यांची प्रतिबंधात्मक उपाययोजना आदी विषयांवर कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शक अरुंधती पेंडसे यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधला. ज्योती घाडगे यांनी स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रमाचे स्वरूप विद्यार्थिनींना सांगितले. ३१५ विद्यार्थिनींनी यात सहभाग घेतला.

# कसोटी सामन्यात पहिला दिवस भारताचा

## वेस्ट इंडिजला १५० धावांत गुंडाळले



**डॉमिनिका : वृत्तसंस्था**

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेला बुधवारी (१२ जुलै) डॉमिनिका येथे सुरुवात झाली. या मालिकेसह टीम इंडियाने २०२३-२५च्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपला सुरुवात केली. पहिल्या कसोटीचा पहिला दिवस भारताच्या नावावर राहिला. त्यांनी पहिल्या डावात वेस्ट इंडिजला १५० धावांत गुंडाळले. यानंतर, खेळ संपला तेव्हा त्याने टीम इंडियाच्या बिनबाद ८० धावा झाल्या होत्या. कर्णधार रोहित शर्मासोबत पदार्पण करणारी यशस्वी जैस्वाल नाबाद आहे. त्याचवेळी अनुभवी रविचंद्रन अश्विनने गोलंदाजीत पाच विकेट्स घेतले. कसोटी क्रिकेटमध्ये त्याने ३३व्यांदा एका डावात पाच विकेट्स घेतल्या आहेत.

रोहित आणि यशस्वी यांनी पहिल्या डावात भारताला चांगली सुरुवात करून दिली. दोघांनी काही अप्रतिम फटके मारले आणि कोणतीही चूक केली नाही. यशस्वी ७३ चेंडूत ४० धावा करून नाबाद आहे. त्याने आपल्या खेळीत सहा चौकार मारले आहेत. त्याचबरोबर रोहितने ६५ चेंडूत ३० धावा केल्या आहेत. त्याने तीन चौकार आणि एक षटकार लगावला. भारत पहिल्या डावात वेस्ट इंडिजपेक्षा ७० धावांनी पिछाडीवर आहे आणि दुसऱ्या दिवशी मोठी आघाडी घेण्याचा त्यांचा प्रयत्न असेल. दुसरीकडे, सामन्यात पुनरागमन करण्यासाठी वेस्ट इंडिजच्या गोलंदाजांना कसरत करावी लागणार आहे.

तत्पूर्वी, वेस्ट इंडिजचा कर्णधार क्रेग ब्रॅथवेटने भारताविरुद्ध नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पहिल्या डावात वेस्ट इंडिजची सुरुवात खराब झाली. त्यांचा निम्मा संघ ७६ धावांवर पॅव्हेलियनमध्ये परतला. रविचंद्रन अश्विनने १३व्या षटकातील पाचव्या चेंडूवर त्याने तागेतारीन चंद्रपॉलला बाद केले. यानंतर अश्विनने कर्णधार क्रेग ब्रॅथवेटला पॅव्हेलियनमध्ये पाठवले. भारतीय कर्णधार रोहित शर्माने ब्रॅथवेटचा झेल घेतला. शार्दुल ठाकूरने आपल्या पहिल्या आणि डावाच्या २०व्या षटकात टीम इंडियाला यश मिळवून दिले. त्याने रेमन रेफरला यष्टिरक्षक इशान किशनकरवी झेलबाद केले. रेफरला १८ चेंडूत केवळ दोन धावा करता आल्या.

रवींद्र जडेजाने जर्मेन ब्लॅकवूडला मोहम्मद सिराजकरवी झेलबाद केले. ब्लॅकवूडने ३४ चेंडूत १४ धावा केल्या. डायव्हिंग करताना सिराजने शानदार झेल घेतला. उपाहारानंतर लगेचच रवींद्र जडेजाने जोशुआ डी सिल्वा झेलबाद केले.

७६ धावांत पाच विकेट्स पडल्यानंतर नवोदित ॲलिक अथेनेझ आणि अनुभवी जेसन होल्डर यांनी डाव सांभाळला. दोघांनी सावध फलंदाजी करत सहाव्या विकेटसाठी ४१ धावांची भागीदारी केली. मोहम्मद सिराजने जेसन होल्डरला शार्दुल ठाकूरकरवी झेलबाद करून ही भागीदारी मोडली. होल्डर ६१ चेंडूत १८ धावा करून बाद झाला. अश्विनने भारताला सातवे यश मिळवून दिले आहे. त्याने अल्झारी जोसेफला जयदेव उनाडकटकरवी झेलबाद केले. अश्विनने अथेनेझला शार्दुल ठाकूरकरवी झेलबाद केले. जडेजाने भारताला नववे यश मिळवून दिले. त्याने केमार रोचला एलबीडब्ल्यू केले. त्यानंतर अश्विनने जोमेल वॅरिकनला बाद करत वेस्ट इंडिजचा डाव गुंडाळला.

## आशियाई ॲथलेटिक्स स्पर्धेत अभिषेक पालला ब्राँझ



**बँकॉक : वृत्तसंस्था**

थील नॅशनल स्टेडियमवर सुरू झालेल्या २४व्या आशियाई ॲथलेटिक्स स्पर्धेत पहिल्या दिवशी सहा सुवर्णपदकांचा फैसला झाला. त्यापैकी तीन इव्हेंटमध्ये भारतीय ॲथलिट्सचा समावेश होता, मात्र भालाफेकपटू अनु राणी, १५०० मीटरमध्ये लिली दासने निराश केल्यानंतर पुरुषांच्या दहा हजार मीटर शर्यतीत अभिषेक पालने अंतिम क्षणी बाजी मारून ब्राँझपदक जिंकले.

अतिशय डावपेचपूर्ण झालेली ही शर्यत जपानच्या रेन तझावाने जिंकली. त्याने सुरुवातीपासून आघाडी घेण्याचे धोरण स्वीकारले होते. कोएच किमुताई याने तझावाचा पाठलाग करणेच पसंत केले, मात्र १० फेऱ्या शिल्लक असताना तो माघारी आला. गुलवीर सिंग व अभिषेक पाल यांनीही मागे राहणेच पसंत केले.

दहा फेऱ्यांनंतर त्यांच्यासोबत जपानचा युतो इमाई धावत होता. तीन फेऱ्या शिल्लक असताना युतोने जवळजवळ दहा मीटरची आघाडी घेतली होती. यात गुलवीरची दमछाक झाली, मात्र अभिषेकने शेवटच्या २०० मीटरमध्ये जोरदार वेग वाढवून ब्राँझपदक जिंकले. गुलवीर सिंग पाचवा आला. अभिषेकने २९ मिनिटे ३३.२६ सेकंद अशी वेळ दिली.

महिलांच्या भालाफेकीत माजी रौप्यपदक विजेत्या अनु राणीला चौथे स्थान मिळाले. तिला ५९.१० मीटर अशीच सर्वोत्तम फेक करता आली. यात जपानच्या मरीना साईतोने सुवर्ण (६१.६७ मीटर), चीनच्या लियु शियिंगने रौप्य (६१.५१ मीटर) व श्रीलंकेच्या दिलहानी लेकामगेने ब्राँझपदक (६०.९३ मीटर) जिंकले.

## टीपीएलमध्ये तीन खेळाडूंकडून सुटला झेल



**चेन्नई : वृत्तसंस्था**

सध्या तामिळनाडू प्रीमियर लीगचा हंगाम सुरु आहे. या स्पर्धेतील दुसरा क्वालिफायर सामना दिंडीगुल ड्रॅगन्स आणि नेल्लई रॉयल किंग्ज यांच्यात खेळला गेला. या सामन्यात नेल्लई रॉयल किंग्जच्या तीन खेळाडूंनी एक झेल सोडला. हा झेल सोडल्यामुळे चाहत्यांना पाकिस्तान क्रिकेट संघाची आठवण झाली.

या सामन्यात नेल्लई रॉयल किंग्जच्या तीन खेळाडूंनी मिळून एक झेल सोडला. या झेलनंतर चाहत्यांना पाकिस्तानचा माजी क्रिकेटर सईद अजमलचा २००८मध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध सोडलेला झेल आठवला. पाकिस्तान आणि वेस्ट इंडिज यांच्यात झालेल्या सामन्यात ख्रिस गेलने उमर गुलच्या चेंडूवर शॉट मारला आणि चेंडू हवेत गेला. झेल पकडण्यासाठी सईद अजमलसोबत शोएब मलिकही पोहचला आणि दोघेही एकमेकांवर विसंबले आणि कोणीही झेल घेण्यास पुढे गेला नाही.

नेमकी हीच घटना तामिळनाडू प्रीमियर लीगमध्येही समोर आली आहे. प्रथम फलंदाजी करताना सुबोत भाटीने २०व्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर डिंडीगुल ड्रॅगन्सकडून शॉट खेळला आणि चेंडू यष्टीरक्षकाच्या मागेत हवेत गेला. यष्टिरक्षकासह तीन खेळाडू झेल पकडण्यासाठी धावले, पण एकमेकांवर विश्वास ठेवून तिघांनीही झेल घेण्याचा प्रयत्न केला नाही. त्यामुळे चेंडू तिघांच्या अगदी मध्यभागी पडला.

## महिला टी-२० मालिकेत भारत विजयी




**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बांगलादेशच्या महिला संघाने अखेरच्या टी२० सामन्यात भारताचा पराभव केला असला तरी तीन सामन्यांच्या मालिकेत भारताने २-१च्या फराकाने विजय मिळवला आहे.

भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करताना १०३ धावांचे आव्हान ठेवले होते. बांगलादेशने हे आव्हान १८.१ षटकात सहा विकेटच्या मोबदल्यात पार केले. बांगलादेशकडून शमीमा सुल्ताना हिने मॅचविनिंग खेळी केली. भारताने दिलेल्या १०३ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना बांगलादेशने आश्वासक सुरुवात केली. बांगलादेशकडून शमीमा सुल्ताना हिने ४६ चेंडूत ४२ धावांची मॅचविनिंग खेळी केली. या खेळीत शमीमा सुल्ताना हिने तीन चौकार लगावले. शमीमा सुल्ताना हिच्याशिवाय बांगलादेशच्या इतर फलंदाजांना मोठी खेळी करण्यात अपयश आले, पण १०३ धावांचा पाठलाग करत बांगलादेशने पहिल्या विजयाची नोंद केली.

हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वातील भारतीय संघाने तीन सामन्याच्या टी २० मालिकेत २-१ ने विजय मिळवला. भारतीय संघाने पहिला आणि दुसरा टी २० सामना जिंकून मालिका आधीच खिशात घातली होती. गुरुवारच्या सामन्यात भारताकडून मिनू मनी आणि देविका वैद यांनी प्रत्येकी दोन दोन विकेट घेतल्या, तर जेमिमा रॉड्रिग्स हिने १ विकेट घेतली.

तिसऱ्या टी २० सामन्यात हरमनप्रीत कौर हिने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने निर्धारित २० षटकांत ९ विकेटच्या मोबदल्यात १०२ धावांपर्यंत मजल मारली होती. भारताकडून सर्वाधिक धावा कर्णधार हरमनप्रीत कौर हिने केल्या.

हरमनप्रीत कौर हिने ४१ चेंडूत ३ चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ४० धावांची खेळी केली. त्याशिवाय जेमिमा रॉड्रिग्स हिने २६ चेंडूत ४ चौकारांच्या मदतीने २८ धावांचे योगदान दिले. या दोघींचा अपवाद वगळता एकाही फलंदाजाला मोठी खेळी करता आली नाही. भारतीय संघातील सात फलंदाजांना दुहेरी धावसंख्या पार करता आली नाही.

बांगलादेशकडून रबिया सुल्तान हिने सर्वाधिक तीन विकेट घेतल्या. तर सुल्ताना खातून हिने २ विकेट मिळवल्या. त्याशिवाय नाहिदा अख्तर, फाहिमा खातून आणि शोरना अख्तर यांनी प्रत्येकी एक एक विकेट घेतली.

## ...म्हणून चेतेश्वर पुजाराला टीम इंडियातून वगळले!

### कर्णधार रोहित शर्माचा खुलासा





**डॉमिनिका : वृत्तसंस्था**

भारतीय संघ सध्या वेस्ट इंडिजच्या दौऱ्यावर आहे जिथे टीम इंडिया दोन कसोटी, तीन वनडे आणि पाच टी-२० सामन्यांची मालिका खेळणार आहे. संघ निवडकर्त्यांनी या दौऱ्यात अनेक नवीन खेळाडूंना संधी दिली आहे. त्याचबरोबर चेतेश्वर पुजाराला या मालिकेतून का वगळले याबद्दल कर्णधार रोहित शर्माने खुलासा केला आहे.

बऱ्याच दिवसांपासून फ्लॉप ठरलेल्या चेतेश्वर पुजाराला या मालिकेत टीम इंडियातून वगळण्यात आले आहे. पुजाराच्या जागी यशस्वी जैस्वालला संघात संधी देण्यात आली आहे. कर्णधार रोहित शर्माने नुकत्याच झालेल्या पत्रकार परिषदेत पुजाराच्या ऐवजी जयस्वालला संघात संधी का मिळाली हे स्पष्ट केले आहे.

टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्माने वेस्ट इंडिजविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यापूर्वी पत्रकार परिषद घेतली. या वेळी त्याने टीम इंडियाच्या प्लेइंग इलेव्हनबद्दल अनेक गोष्टी सांगितल्या. त्याने असेही सांगितले की, यशस्वी जैस्वाल वेस्ट इंडिजविरुद्ध पहिला कसोटी सामना खेळणार असून तो त्याच्यासोबत सलामी करताना दिसणार आहे. शुबमन गिल तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करेल. याआधी चेतेश्वर पुजारा टीम इंडियाच्या संघात तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करायचा.

रोहितने पत्रकार परिषदेत स्पष्ट केले की, टीम इंडियाला आघाडीच्या फळीतील एका डावखुऱ्या फलंदाजाची दीर्घकाळ गरज होती, जो त्याला यशस्वी जैस्वालच्या रूपाने दिसतो. यशस्वीने फॉर्ममध्ये असलेल्या डावखुऱ्या फलंदाजाच्या रूपाने प्रभावित केले आहे, तर गिलला स्वतः तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करायची होती.

रोहित म्हणाला की गिल त्याच्याकडे आला आणि त्याला सांगितले की, त्याने आपल्या संपूर्ण कारकिर्दीत तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी केली आहे. त्यामुळे जर त्याने टीम इंडियासाठी त्या क्रमांकावर फलंदाजी केली, तर तो चांगली कामगिरी करू शकतो. पुजाराला संघातून वगळण्यामागे कुठेतरी हे कारण असू शकते, जेणेकरून टीम इंडिया शीर्ष क्रमात हे बदल करू शकेल.

## भारताच्या निषाद कुमारने रौप्यपदक जिंकले

**पॅरिस : वृत्तसंस्था**

भारताच्या निषाद कुमारने पॅरा ॲथलेटिक्स वर्ल्ड चॅम्पियनशिप २०२३मध्ये




रौप्यपदक जिंकले आहे. उंच उडी टी-४७ स्पर्धेत निषादने ही कामगिरी केली. यासह या स्पर्धेत पदक जिंकणारा निषाद हा दुसरा खेळाडू ठरला आहे.

निषादने सहाव्या आणि शेवटच्या प्रयत्नात २.०९ मीटर उंडी घेत रौप्यपदकावर नाव कोरले, तर अमेरिकेच्या खेळाडूने सुवर्ण पटकावले. लक्षणीय बाब म्हणजे टोकियो ऑलिम्पिकमध्येदेखील रौप्य पदक जिंकणाऱ्या निषादने २.०७ मीटर उडी मारण्याचा यशस्वी प्रयत्न केल्यानंतर तो पाचव्या फेरीपर्यंत दुसऱ्या स्थानावर होता. त्याने अंतिम प्रयत्नात अप्रतिम झेप घेऊन रौप्यपदकावर शिक्कामोर्तब केला. हिमाचल प्रदेशच्या या निषादने २०१९मध्ये कांस्यपदक जिंकले होते.

पॅरा ॲथलेटिक्स वर्ल्ड चॅम्पियनशिप २०२३मध्ये पहिली चार पदके जिंकणाऱ्या शिलेदारांना २०२४च्या पॅरालिम्पिक गेम्समधील सर्व वैयक्तिक पदक स्पर्धांमध्ये भाग घेण्याची संधी मिळणार आहे. यात निषादचा समावेश झाला आहे.

जीवेत् शरदः शतम्!
उमेश पाटील
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
योगेश पाटील



जीवेत् शरदः शतम्!
आशुतोष म्हात्रे
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
विनायक नाईक



जीवेत् शरदः शतम्!
राजू मढवी
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
अजित राणे



### विम्बल्डन टेनिस स्पर्धा

## रायबाकिनाचा उपांत्यपूर्व फेरीत पराभव



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

गतविजेती आणि तिसरी मानांकित एलिना रायबाकिना हिला विम्बल्डन ग्रँडस्लॅम या टेनिस स्पर्धेतील महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत पराभवाला सामोरे जावे लागले. ट्युनिशियाच्या ओन्स जॅब्यूएर हिने बुधवारी रायबाकिना हिला ६-७, ६-४, ६-१ असे तीन सेटमध्ये नमवून उपांत्य फेरीत प्रवेश केला.

जॅब्यूएर हिला या स्पर्धेसाठी सहावे मानांकन देण्यात आले आहे. कझाकस्तानच्या रायबाकिना हिने पहिला सेट ७-६ असा जिंकत सुरुवात छान केली, पण पुढील सेटमध्ये जॅब्यूएर हिने झोकात पुनरागमन केले. तिने या सेटमध्ये ६-४ असा विजय साकारला आणि लढतीत बरोबरी साधली.

अखेरच्या सेटमध्ये जॅब्यूएर हिच्या दमदार खेळासमोर रायबाकिनाचा निभाव लागला नाही. अखेर जॅब्यूएर हिने ६-१ असा हा सेट जिंकत अंतिम चारमध्ये प्रवेश केला. आता उपांत्य फेरीच्या लढतीत तिच्यासमोर एरीना सबलेंका हिचे आव्हान असणार आहे.

जागतिक क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर असलेल्या बेलारुसच्या एरीना सबलेंका हिने महिला एकेरी गटाची उपांत्य फेरी गाठली. विम्बल्डन ग्रँडस्लॅमच्या उपांत्य फेरीत प्रवेश करण्याची सबलेंकाची ही दुसरीच खेप ठरली हे विशेष.

## तुटलेल्या जबड्यासह केलेल्या गोलंदाजीबाबत कुंबळेचा उलगडा



**बंगळुरू : वृत्तसंस्था**

भारताचा महान फिरकी गोलंदाज अनिल कुंबळेने २००२च्या अँटिग्वा कसोटीत वेस्ट इंडिजविरुद्ध तुटलेल्या जबड्याने गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता, तेव्हा त्याची पत्नी चेतना हिला वाटले की तो विनोद करीत आहे. त्या वेळी कुंबळेने धाडसी निर्णय घेत सलग १४ षटके टाकली आणि दिग्गज फलंदाज ब्रायन लारालाही बाद केले.

कुंबळेने जिओ सिनेमाला दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, मी माझ्या पत्नीला सांगितले, मला ऑपरेशनसाठी भारतात परतायचे आहे. तिने बंगळुरूमध्ये सर्व व्यवस्था केली. फोन ठेवण्यापूर्वी मी तिला म्हटले की, मी गोलंदाजी करायला चाललो आहे. तिला वाटले मी मस्करी करतोय. तिने ते गांभीर्याने घेतले असेल, असे मला वाटत नाही.

माजी कर्णधार कुंबळे म्हणाला की, त्याचा जबडा तुटला असला तरी संघासाठी काही विकेट्स मिळवणे ही आपली जबाबदारी आहे, असे त्याला वाटत होते. जेव्हा मी ड्रेसिंग रूममध्ये गेलो तेव्हा मी सचिनला गोलंदाजी करताना पाहिले. त्या वेळी वेव्हेल हिंड्स फलंदाजी करत होता. मला वाटले ही माझी संधी आहे. मला जाऊन विकेट घ्यावी लागेल. जर त्यांच्या तीन-चार विकेट घेतल्या, तर आम्ही सामना जिंकू शकतो.

कुंबळे दुसऱ्या दिवशी बंगळुरूला परतणार होता. त्या वेळी तो म्हणाला, मी माझ्याकडून सर्वोत्तम प्रयत्न केले हे जाणून किमान मी घरी जाईन. सातव्या क्रमांकावर फलंदाजी करताना कुंबळेला मर्विन डिलनचा चेंडू लागला होता, पण रक्तस्त्राव होऊनही त्याने आणखी २० मिनिटे फलंदाजी केली होती.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com